


जगाच्या वाङ्मयात ज्या काही लेखकांची नावे चिरकाल टिकून राहतील त्यापैकी अलेक्झांडर ड्यूमा एक होय. त्याच्या बापाचे घराणे सरदाराचे, पण त्याला दारिद्र्य आलेले होते.

थोर वाङ्मयसंपत्ती मागे ठेवणाऱ्या या लेखकाचा जन्मही दारिद्र्यात आणि शेवटही दारिद्र्यातच व्हावा ही विधिघटनाच होय.

'तिसरा हेन्री' या नाटकामुळे तो विशेष प्रसिद्धीला आला.

एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वार्धात फ्रान्समध्ये ॲलेक्झांडर ड्यूमा (१८०२-१८७०) याने आपल्या साहसप्रधान रोमांचकारी नवलकथांनी अपूर्व खळबळ उडवून दिली. फ्रान्सचा राजा, राणी व त्यांचे सल्लागार यांच्यातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली 'दि थ्री मस्केटीअर्स' ही प्रदीर्घ कादंबरी कमालीची लोकप्रिय झाली.

इ.स. १६२५ मध्ये १३वा लुई फ्रान्सवर राज्य करीत होता. परंतु खरी सत्ता प्रधानमंत्री कार्डिनल रिचल्यू याच्या हातीच होती. फ्रान्सची राणी ऑस्ट्रियन राजकन्या ॲन ही त्याचा द्वेष करी. कार्डिनलही लुईचे मत राणीविषयी कलुषित करण्याची वाट पाहात असे. फ्रान्सची राणी व इंग्लंडमधील ड्यूक ऑफ् बकिंगहम यांचा प्रेमसंबंध जुळून आल्याची गुणगुण कार्डिनलला लागली व राणीचा सूड घेण्याचे एक साधनच त्याच्या हाती आले. कार्डिनलने त्यासाठी उभारलेले कारस्थान हाच या कादंबरीचा कथाभाग आहे.

ते कारस्थान त्याच्यावरच उलटवून आपली योग्यता सिद्ध करणारे विश्वासू, शूर असे तीन शिलेदार आणि त्यांचे नेतृत्व करणारा चलाख हिकमती डार्टा यांच्या अनेक मसलती या कथेत गुंफल्या आहेत. फ्रान्समधील राज्यक्रांतीपूर्वीचे राजकीय वातावरणही त्यांतून समजते.

ड्यूमाच्या 'थ्री मस्केटिअर्स' कादंबरीची ही सारांश कथा आहे.

*अलेक्झांडर ड्यूमा हा दत्त आपटे यांचा एक आवडता लेखक, त्यांच्या काळातील वाचकांवरही त्याचा प्रभाव होता. त्याच्या प्रचंड ग्रंथसंभाराचे आश्चर्य ते व्यक्त करीत. त्यांपैकी तीन कथा - भागांचा अनुवाद उषा आपटे यांच्या नावावरती प्रसिद्ध झाला, हे पहिले पुस्तक १९४६ सालचे. नंतर त्याच्या ३आवृत्या निघाल्या.*

| | प्रकरण | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | डार्टाचा प्रवास | १०४ |
| २ | मिअंग येथील प्रकरण | १०५ |
| ३ | हरवलेले पत्र | १०७ |
| ४ | मॉन्सिर द त्रिवेल | १०९ |
| ५ | तीन शिलेदार | ११० |
| ६ | विकतचे श्राद्ध | ११३ |
| ७ | द्वंद्व | ११६ |
| ८ | राजा | ११८ |
| ९ | मॉन्सिर बॉन्सिअ | ११९ |
| १० | मादाम बॉन्सिअ | १२१ |
| ११ | डार्टा आणि बकिंगहॅमचा ड्यूक | १२३ |
| १२ | रत्नहार | १२५ |
| १३ | फ्रान्सची राणी | १२८ |
| १४ | प्रवास | १३० |
| १५ | फिरून बकिंगहॅमचा ड्यूक | १३३ |
| १६ | नृत्य | १३५ |



# तीन शिलेदार

## १ डार्टाचा प्रवास

एप्रिल १६२५ मधील एक दिवस. दक्षिण फ्रान्समधील गॅस्कनी परगण्यात असलेल्या एका खेड्यामधून भल्या सकाळी डार्टा बाहेर पडला. आपले छोटे खेडे सोडून जगात दैव उजळण्यासाठी तो निघाला होता. डार्टा मोठा उत्साही तरुण होता. त्याचा पिंगट रंग, गालाची किंचित् उंच आलेली हाडे व चमकदार डोळे ह्या सर्वांचा मेळ मोठा सुंदर होता. खेडवळपणाची त्याच्यावर असलेली थोडीशी झांक सोडल्यास त्याला नावे ठेवण्यास कोठे जागाच नव्हती. अंगात लोकरीची ऊबदार बंडी, डोक्यावर पिसांची टोपी व कमरपट्ट्यात अडकविलेली तरवार असा त्याचा एकंदर झोक होता. त्याच्या ह्या सर्व सामग्रीत लक्षात येण्याजोगी खरी भर कोणी घातली असेल तर ती त्याच्या घोड्याने! त्याचे हे तट्टू जर्द पिवळ्या रंगाचे होते. हा अजब रंग पाहून वाटेचे वाटसरू त्याच्याकडे वळून-वळून का पाहणार नाहीत?

आपल्या वडिलांनी दिलेल्या ह्या वारूवर स्वार होऊन जाणे म्हणजे कुचेष्टेला पात्र होणे हे डार्टाला माहीत नव्हते असे मात्र नाही, पण वडिलांची ही देणगी नाकारणे मात्र त्याला शक्य नव्हते; आणि म्हणूनच ह्या घामट पिवळ्या तट्टावर त्याला स्वार होणे भाग पडले. त्याच्या वडिलांनी त्याला बाहेर पडताना उपदेशाच्या चार गोष्टीही सांगितल्या होत्या. ''पोरा, राजदरबारी जाण्याचा योग आला तर आपल्या घराण्याच्या लौकिकाला उचित असाच वाग. आपला खानदानी बाणा सोडू नकोस. तुझ्या आणि तुझ्या घराण्याच्या लौकिकाला कमीपणा येईल असं काही करू नकोस. राजा आणि कार्डिनल ह्या दोघांवाचून कोणाकडूनही फट् म्हणून घेऊ नकोस. साहसात आणि भांडणात तुझं पाऊल पुढं असू दे. तुला मी तरवार वापरण्यास शिकवलं आहे, तुझे स्नायू लोहमय आहेत, मूठ पोलादी आहे. संधी मिळाली की झुंज सोडू नकोस!

''आता हा पिवळा घोडा आणि हे पंधरा क्राऊन एवढंच काय ते तुला देण्यासारखं मजजवळ राहिलं आहे. मॉन्सिर द त्रिवेल आपला शेजारी होता, त्याचा दाखला डोळ्यापुढं ठेव. लहानपणीच तेराव्या लुई महाराजांपाशी त्याला खेळगडी म्हणून राहण्याची संधी मिळाली आणि आता तर कार्डिनल रिशल्यूही म्हणे त्याला भिऊन असतो. जगात कोणालाही न भिणारा कार्डिनल मॉन्सिर त्रिवेलला भितो, ही गोष्ट लक्षात ठेव! त्रिवेलनं आपल्या जीवनाला आरंभ तर तुझ्यासारखाच केला; पण त्याच्या यशाचं मर्म एकच. त्यानं आपली तरवार चालविण्याच्या कामी कधी कुचराई केली नाही की भ्याडपणा दाखविला नाही. मी त्याला लिहिलेलं हे पत्र घे. हे पत्र त्याला दाखव आणि त्याच्याप्रमाणेच आपलंही दैव काढ!''

जखमा तत्काळ बऱ्या करणाऱ्या मलमाची त्याच्या आईने दिलेली डबी व ते पत्र डार्टाने आपल्या

बंडीच्या खिशात ठेवून दिले आणि घोड्यावर स्वार होऊन आगेकूच केले. घोड्यावरून डचंव् डचंव् करीत जाता-जाता तो आपल्या बापाच्या उपदेशाचा विचार करीत होता. वारंवार त्याचा हात तरवारीच्या मुठीकडे जाई किंवा तो क्रोधाने नुसताच मुठी वळी; कारण सडकेने जाताना स्मित करणारा प्रत्येक वाटसरू आपली कुचेष्टा करीत असावा असे त्याला वाटे आणि भांडण काढण्यास एवढे कारण त्याला पुरे होते. त्याच्या घोड्याचे ते पिवळे कातडे पाहून कित्येकांना हसण्याचा मोह होई ही गोष्ट काही खोटी नव्हती; पण स्वाराची तडफ व त्याची मूठ पाहून ते जरा आवरते घेत व त्यामुळे फारसा कटू प्रसंग येत नसे. डार्टाचा बराच प्रवास ह्याप्रमाणे झगडा न होता झाला एवढे खरे!

●●●

## २. मिअंग येथील प्रकरण

मिअंग नगरी येताच डार्टा एका पथिकाश्रमासमोर आपल्या घोड्यावरून खाली उतरला. आपला घोडा एखाद्या मोतद्दाराच्या स्वाधीन करावा म्हणून तो इकडे तिकडे पाहू लागला, तोच पथिकाश्रमाच्या तळमजल्यावरील खिडकीत एक मनुष्य बसलेला त्याच्या दृष्टीस पडला. त्याच्या चेहेऱ्यावर गर्विष्ठपणाची झांक होती व त्याचा एकंदर आविर्भावही जरा कुर्ऱ्याचाच होता. तो ज्या दोन माणसांशी बोलत होता तीही पण त्याच्याशी अगदी लीनतेनेच वागताना दिसत होती. मधून-मधून त्यांच्यात हास्याचा एकच कल्लोळ उठत होता व त्या प्रत्येक हास्यलहरीसरशी डार्टाचे पित्त अधिकच भडकत होते. कारण त्याची आता अशी ठाम समजूत होऊ लागली होती की, तो गर्विष्ठ मनुष्य आपल्यावर व आपल्या वारूवर टीका करीत असावा आणि वस्तुस्थिती खरोखर तशीच होती. डार्टाच्या पीत वारूवर तो मनुष्य काही विनोद करी व त्याचे ते दोन श्रोते त्या विनोदाने अत्यंत संतुष्ट होऊन पोट धरधरून हसत.

ह्या प्रकाराने तापलेला डार्टा त्याला जाब विचारण्यासाठी तिकडे गेला. त्या माणसाचे वय चाळीस-पंचेचाळीस वर्षांचे असून त्याचे डोळे तीक्ष्ण व काळेभोर होते. त्याचा वर्ण फिकट असून त्याच्या गालावर जखमेचा एक भला मोठा वण दिसत होता. डार्टा त्या मनुष्याचे निरीक्षण करण्यात गुंतला आहे तोच त्याने स्मित केले व त्याच्या त्या दोन श्रोत्यांनी हास्याचे फवारे उडविले. डार्टाच्या रागाचा पारा पूर्ण चढविण्यास एवढे कारण बस्स होते. त्याने आपल्या तरवारीच्या मुठीला हात घालून त्या अनोळखी मनुष्यावर चाल केली. प्रत्येक पावलागणिक त्याचा राग भडकत होता. काहीतरी प्रौढ भाषण करून त्याला आव्हान करण्याचा त्याचा बेत कोठल्या कोठे गेला व दात ओठ खात तो ओरडला ''ए भागूबाई! दडून का हसतोस? कोणास पाहून हसतोस ते तरी सांग म्हणजे आपण दोघे मिळूनच हसू.'' डार्टाच्या घोड्यावर खिळलेली आपली दृष्टी काढून त्या गृहस्थाने ती तितक्याच मस्तवालपणे घोड्याच्या धन्याकडे वळविली व आपल्याला इतक्या उद्धटपणाने बोलणाऱ्या व्यक्तीकडे तो आश्चर्याने पाहू लागला. तो तावातावाने म्हणाला, ''महाराज, मी आपणाशी बोलत नव्हतो.''

संतापाने भडकलेला डार्टा चवताळून ओरडला, ''पण मी आता तुमच्याशी बोलतो आहे ना!''

त्या माणसाने डार्टाकडे फिरून एकदा निरखून पाहिल्यागत केले व तिरस्कारयुक्त स्मित करीत तो पथिकाश्रमाच्या बाहेर आला. तो डार्टाच्या घोड्यापाशी येऊन उभा राहिला. आता डार्टा आणि तो ह्यांच्यामध्ये काही पावलांचेच मात्र अंतर होते. तेथून खिडकीत उभ्या असलेल्या आपल्या मित्रांना उद्देशून तो म्हणाला,

''हा वारू लहानपणी एखाद्या बगीचातच जन्मला-वाढला असला पाहिजे. बेट्याचा रंग तर पाहा कसा झेंडूच्या फुलागत आहे. अलीकडील घोड्यांत असा नमुना पाहावयास निश्चित मिळणार नाही.

''घोड्याच्या धन्याची कुचेष्टा करण्याची छाती नसणाऱ्या  भागूबाईंनी आपली कुचेष्टेची हौस घोड्यावरच भागवून घ्यावी.'' डार्टा चडफडला.

''गड्या, माझ्या चेहऱ्यावरून मला हसण्याची फारशी आवड नाही हे तुला दिसलं असेलच. पण हसण्याची लहर आली तर मात्र मला तो हक्क आहेच. त्याच्या आड कोण येणार?'' तो गृहस्थ म्हणाला.

''पण हे हास्य मला अप्रिय आहे ते थांबविण्याचा मलाही हक्क आहे.'' डार्टा गुरगुरला.

''खरंच!'' तो परका गृहस्थ अगदी शांतपणाने म्हणाला. पथिकाश्रमात जाण्यासाठी तो परत फिरला मात्र -खर्रकन् आपली तरवार उपसून डार्टा आडवा झाला व ओरडला,

''अहो विदूषकमहाशय, फिरा, मागे फिरा, नाही तर निरुपायाने आपल्या पाठीवर मला वार करावा लागेल.''

झटकन् वळून व डार्टावर एक तिरस्कारपूर्ण कटाक्ष टाकून तो गृहस्थ तुच्छतेने म्हणाला, ''तू आणि माझ्यावर वार करणार! बेटा, वेड-बीड तर लागलं नाही?'' त्याचे भाषण संपते न संपते तोच डार्टाने त्याच्यावर धडक मारली. चपळाई करून तो मागे सरला व त्यानेही आपली तरवार काढली. जरा विलंब झाला असता तर तो जखमीच व्हावयाचा. गोष्ट ह्या थराला येताच आतापर्यंत खिडकीत उभे राहून खिदळणारे त्याचे मित्र काठ्या फावडी घेऊन आपल्या मित्राच्या साहाय्यास धावले व डार्टास त्यांनी चांगलाच हादरा दिला. हा आकस्मिक भडिमार होताच डार्टाने तात्काळ आपला मोर्चा त्यांच्याकडे वळविला व तो गृहस्थ तरवार म्यान करून उगीच गंमत पाहात उभा राहिला. थोड्या वेळानंतर तो म्हणाला,

''मरो एकदा ही गॅस्कनची जात. घाला लेकाला एकदा त्या पिवळ्या घोड्यावर आणि द्या पिटाळून.''

''आधी तुझा मुडदा पाडतो; मग साऱ्या गोष्टी.'' डार्टा दात-ओठ खात किंचाळला.

''तिंबवा लेकाला चांगला, त्याची हौस दिसते आहे. पुरी रग जिरली म्हणजे सांगेल आपणहूनच.'' तो मनुष्य आपल्या मित्रांना उद्देशून म्हणाला.

पण डार्टा काही दयेची याचना करणारा माणूस नव्हे हे कोठे त्याला ठाऊक होते? आणखी हे भांडण तर त्याने आपणहून काढले होते. तो अगदी शौर्याची शर्थ करून लढत होता. पण दुर्दैव त्याचे, एका सोटक्याने त्याच्या तरवारीचे दोन तुकडे झाले व दुसरा नेमका त्याच्या मस्तकात मध्यावर बसला. रक्तबंबाळ होऊन तो धाडकन् भुईवर आदळला आणि बेशुद्ध झाला.

ह्या वेळेपर्यंत पथिकाश्रमाच्या आवारात लोकांच्या झुंडीच्या झुंडी गोळा झाल्या होत्या. पथिकाश्रमाच्या धन्याने आरडा-ओरड करून आपल्या नोकरांना गोळा केले व डार्टाला स्वयंपाकगृहात नेऊन त्याच्या जखमांवर औषधोपचार चालू केले. इकडे हा परकी गृहस्थ आपल्या खिडकीत परत जाऊन बसला व मित्रांशी हास्य-विनोद करू लागला. त्याला कोठे जखम-बिखम झाली नाही ना, ह्याची चौकशी करण्यासाठी आलेल्या पथिकाश्रमाच्या धन्याला उद्देशून तो म्हणाला, ''कसं काय आहे त्या वेडपटाचं?''

''ठीक आहे. बेशुद्ध झाला होता लेकाचा!'' धनी म्हणाला.

''खरंच?''

''शुद्धीत असताना लेकाचा सारखा आपला खिसा चाचपडत होता आणि म्हणत होता की, आपल्या तरुण मित्राचा असा उपमर्द केल्याबद्दल मॉन्सिर त्रिवेल काय ते पाहून घेईल.''

''मॉन्सिर द त्रिवेल?'' पाहूणा खडबडून म्हणाला, ''मेरे प्यारे मालिकसाहेब! तो बेशुद्ध असताना त्याच्या त्या खिशात एवढं काय दडलं होतं ते आपण खरंच काढून पाहिलं असेल, नाही?''

''शिलेदारांचा मुख्य अधिकारी मॉन्सिर द त्रिवेल ह्यांच्या नावाचं एक पत्र होतं त्यात.''

''आँ! खरं म्हणता काय?''

अस्वस्थ झालेला पाहुणा पुन्हा म्हणाला, ''त्रिवेलनं तर मला ठार मारण्यासाठी ह्या पोरट्याला पाठवलं नाही ना? धनीमहाशय, ह्या पोरट्याला ठार मारण्याची मला इच्छा नाही, पण माझ्या मार्गातून मात्र त्याला आता दूर करा. काय वाटेल ते करून त्याला आता मार्गाला लावा. कोठे आहे तो आता?''

''पहिल्याच मजल्यावरील एका खोलीत तो आहे. माझी

बायको त्याच्या जखमा बांधीत आहे.''

''त्याचं सामान-सुमान त्याच्याजवळच आहे काय? त्यानं आपली बंडी काढून ठेविली आहे काय?''

''त्याचं सर्व काही खाली स्वयंपाकगृहात आहे. त्या तिरसट वेडपटानं तुम्हाला चांगलाच उपद्रव दिलेला दिसतो...''

''तर काय! नकोच शिंचा हा त्रास. माझा आकडा तयार करा व माझ्या नोकरांना पाठवून द्या.''

''बाहेर आपला घोडा खोगीर घालून सज्ज आहे महाराज.'' धनी म्हणाला.

''आता हे पाहा, असं करा.'' नंतर तो पाहुणा स्वत:शीच पुटपुटला, ह्या पोराला मिलडीनं पाहाता कामा नये. तिला वस्तुत: उशीर झाला आहे. पण बहुधा ती आता इतक्यात येईलच; पण आता मीच तिला भेटण्यास जातो. त्रिवेलच्या त्या पत्रात काय असावं बरं?'' असे पुटपुटत तो हळूच स्वयंपाकगृहाच्या दिशेने चालू लागला.

इकडे डार्टाला तत्काळ पथिकाश्रम सोडण्यास सांगण्यासाठी म्हणून धनी वर गेला.

●●●

## ३. हरवलेले पत्र

अंगातून बरेच रक्त गेल्यामुळे डार्टाला चांगलाच अशक्तपणा आला होता. त्याच्या अंगावर त्याची बंडी नव्हती व जखमा बांधण्यासाठी डोक्याला खचाटलेल्या फडक्यांनी डोके जड होऊन गेले होते. इकडे धन्याने तर पथिकाश्रम सोडून जाण्याविषयी नुसती झक्कड उठविली होती. तो खाली आला त्या वेळी त्याचा शत्रू त्याच्या घोड्यापाशी उभा असून शिग्रामात बसलेल्या कोणातरी व्यक्तीशी बोलत आहे असे त्याला दिसले. त्याने जरा जवळ जाऊन निरखून पाहिले. शिग्रामात एक सुंदर स्त्री बसली होती व तिच्याशीच त्याचा शत्रू बोलत उभा होता.

''कार्डिनल मला अशी आज्ञा आहे की ....'' ती सांगत होती.

''तू एकदम इंग्लंडला जावंस व ड्यूकनं लंडन सोडताच त्याला तत्काळ कळवावंस असंच ना?'' डार्टाचा शत्रू तिला एकदम म्हणाला.

''आणि तुम्ही? तुम्ही काय करणार आहात?'' त्या स्त्रीने विचारले.

''मी पॅरीसला परत जाईन.''

''त्या उद्दाम पोराला काही शिक्षा केल्यावाचूनच?''

ह्यावर तो परकीय गृहस्थ काही उत्तर देणार तोच आतापर्यंत त्यांचे भाषण तुटक-तुटकपणे ऐकणारा डार्टा पथिकाश्रमातूनच ओरडून म्हणाला, ''हा उद्दाम पोरगा दुसऱ्याला शिक्षा करीत असतो. मघाशी एकदा निसटलास, आता पाहातो माझ्या तडाख्यातून कसा सुटतोस ते.''

पाहुण्याने तरवारीच्या मुठीला हात घातलेला पाहून शिग्रामात बसलेली ती स्त्री ओरडून म्हणाली, ''इथं झगडण्यात वेळ मोडता उपयोगी नाही. थोड्याशा विलंबानं सर्वच गोष्टींचा नाश होईल हे विसरू नका!''

''ते खरंच. अच्छा तर नमस्कार.'' असे त्या स्त्रीला लवून म्हणून त्याने आपल्या घोड्याला टाच दिली. क्षणात विरुद्ध दिशांनी घोडा व शिग्राम दौडले. ''भित्री भागूबाई!'' वायुवेगाने दौडलेल्या त्या परक्या गृहस्थाकडे पाहात डार्टा पुटपुटला.

''ए ऽ ऽ माझे पैसे?'' पथिकाश्रमाचा धनी ओरडला.

त्याच्या नोकराने काही चांदीची नाणी त्या धन्याच्या अंगावर फेकली व आपल्या धन्याच्या पाठोपाठ आपलाही घोडा दौडला.

डार्टाने त्यांचा पाठलाग केला असता, पण त्याच्या त्या पिवळ्या तट्टाची गती त्याला माहीत होती; आणि दुसरे म्हणजे त्याच्या जखमांच्या वेदना अद्यापि असह्यच

होत्या. जरा धडपड केल्यास आपण बेशुद्धच होऊ हे तो ओळखून होता. त्या रात्री त्याने पथिकाश्रमातच झोप काढली व दुसऱ्या दिवशी सकाळी त्यानं स्वत:च आईने दिलेल्या मलमाचा उपयोग करून आपल्या जखमा बांधल्या. तिसऱ्या दिवशी त्याला पूर्ण हुशारी वाटली व त्याने पॅरिसला जाण्याची सिद्धता केली. पथिकाश्रमाचे पैसे भागविण्याच्या वेळी त्याच्या लक्षात आले की आपल्या खिशातील पत्र नाहीसे झाले आहे. झाले! डार्टाचे पित्त फिरून एकदम भडकले आणि पत्र न सापडल्यास सबंध पथिकाश्रम उलथा-पालथा करून टाकण्याची त्याने त्याच्या धन्याला धमकी दिली. त्यामुळे आश्रमाचा धनी, त्याची बायको, नोकर-चाकर ह्या सर्वांनी झाडण्या, काठ्या, फावडी, हाताला लागेल ते घेऊन बचाव करण्याची सिद्धता केली. ''मॉन्सिर द त्रिवेलना ते पत्र द्यायचं आहे आणि ते मिळालं नाही तर मी त्यांना काय सांगू? माझी दाद तिथं कशी लागणार?'' तो चडफडला. त्याच्या ह्या धमकावणीने धन्याची चांगलीच गाळण उडाली. राजा आणि कार्डिनल ह्यांच्या खालोखाल लोक कोणाला भीत असतील तर ते त्रिवेलला. त्रिवेलचे नाव ऐकताच त्याला कापरे भरले, त्याने झाडू दूर फेकला व बायकोला आणि नोकरांना डार्टाचे पत्र कसून हुडकण्याची आज्ञा केली.

''पत्रात काही महत्त्वाची गोष्ट होती काय?'' त्याने डार्टाला हळूच विचारले.

''होती काय म्हणजे काय? होतीच! माझं सारं दैव त्या पत्रात आहे. एक हजार पौंड हरवले असते तरी चालले असते, पण ते पत्र हरवता उपयोगी नाही.''

डार्टाने पैशाचा उल्लेख करताच पथिकाश्रमाच्या धन्याच्या बथ्थड डोक्यात एकदम प्रकाश पडला आणि तो एकदम ओरडला, ''मग ते पत्र हरवलं नाही निश्चित!''

''काय?''

''ते पत्र चोरीलाच गेलं आहे.''

''पण ते कोणी चोरलं?''

''दोन दिवसांपूर्वी आपण ज्याच्याशी मारामारी केलीत त्यानंच ते चोरलं असलं पाहिजे. त्या दिवशी तो एकटाच स्वयंपाकगृहात घुसला होता व तुमची बंडीही तिथंच होती. हटकून त्याचंच काम हे!''

''खरंच तुम्हाला असं वाटतं?''

''अगदी निश्चित. माझी पूर्ण खात्री आहे ह्यासंबंधी.'' धनी म्हणाला.

''मी तुम्ही मॉन्सिर द त्रिवेलचे मित्र असावेत व त्यांच्यासाठी तुमच्या खिशात एक पत्र आहे असं त्याच्याजवळ बोललो होतो. तुमच्या बंडीच्या खिशात ते असून बंडी स्वयंपाकगृहात आहे एवढं कळताच तो तिकडे गेल्याचंही मला स्मरतं.''

''त्यानं मला पुरतंच लुबाडलं.'' डार्टा विवळला. ''मी ह्यासंबंधी त्रिवेलजवळच काय, पण प्रत्यक्ष राजेसाहेबांजवळही गाऱ्हाणं नेल्या-वाचून राहाणार नाही.'' त्यानंतर विशेष हुज्जत न घालता डार्टाने आपल्या पीत वारूवर स्वार होऊन पॅरिसच्या दिशेने कूच केले. पॅरिसच्या वेशीत पोहोचताच त्याने पहिली गोष्ट केली, ती म्हणजे त्याने आपला तो तुफान वारू लिलाव करून विकून टाकला. नंतर पायी भटकत त्याने शहराच्या मध्य वसतीतील एक जागा आपल्या निवासस्थानासाठी पसंत केली. झोपण्यापूर्वी त्याने आपले कपडे नीट करून घेतले व तरवारीला नवे पाते बसविले. सकाळी ठाक-ठीक पोषाख करून व कमरेला तरवार लटकावून तो त्रिवेलला भेटण्यास निघाला.

●●●

## ४. मॉन्सिर द त्रिवेल

राजशिलेदारांचा मुख्य मॉन्सिर द त्रिवेल अगदी सामान्य स्थितीतून वर आलेला होता. डार्टाची आजची स्थिती व त्याची काही वर्षांपूर्वीची स्थिती ह्यात काहीच अंतर नव्हते. डार्टाप्रमाणे तोही गॅस्कनीमधूनच दैव काढण्यासाठी पॅरिसला आला व त्यावेळी त्याच्या खिशात फुटकी कवडीही नव्हती. आपले शौर्य, बुद्धिमत्ता व दूरदर्शीपणा ह्यांवरच तो पुढे आला होता. पैशाचा आधार त्याला नव्हता, पण ह्या गुणत्रयीचा आधार भक्कम होता. त्याच्या बापाने चौथ्या हेन्रीची नोकरी अत्यंत प्रामाणिकपणे बजाविलेली असल्याने तरुण त्रिवेलला हेन्रीच्या मुलाच्या म्हणजे तेराव्या लुईच्या दरबारात प्रवेश मिळण्यास फारशी अडचण पडली नाही. लुईच्या आत्यंतिक विश्वासातील काही निवडक मंडळीत त्रिवेलचा समावेश होई. लुईच्या पदरी अनेक शूर माणसे होती, पण त्रिवेलच्या ठिकाणी इमान व शौर्य ह्या दोनही गोष्टी असल्याने राजाची त्याच्यावर बरीच कृपा होती व म्हणूनच आपल्या शरीररक्षकांचा प्रमुख म्हणून त्याने त्रिवेलची योजना केली होती. राजाच्या अत्यंत विश्वासातील माणसांवाचून इतर कोणालाच ही जागा मिळत नसे.

त्यावेळी फ्रान्सचा प्रधानमंत्री कार्डिनल रिशल्यू असून राजापेक्षा अधिक नसली तरी राजाइतपत त्याची सत्ता फ्रान्समध्ये चाले. कार्डिनल व राजा ह्यांच्यामधील स्पर्धा अंतस्थरित्या चांगलीच होती, पण कित्येक वेळा ती प्रगटही होई. राजाने निवडक शूर लोकांचे शरीरसंरक्षक पथक उभारताच कार्डिनललाही आपल्याला शरीरसंरक्षक असावेत असे वाटू लागले. त्यायोगे राजा व कार्डिनल ह्या दोघांची दोन स्वतंत्र शिलेदारपथके उभारिली जाऊन त्यात फ्रान्समधीलच काय, पण कोठीलही शूर माणसांचा भरणा करण्याची स्पर्धा चालू झाली.

मॉन्सिर द त्रिवेल राजशिलेदारांचा प्रमुख म्हणून नेमला जाताच तो आपल्या शिलेदारांच्या पथकाच्या कवायती जाणून-बुजून कार्डिनलच्या दृष्टीस पडतील अशा रीतीने घेई. त्यांना बुद्ध्या त्यांच्या पुढून चाल करावयास लावी. कार्डिनलच्या मिशा ह्या साऱ्या प्रकाराने फेंदारल्या जात. त्याच्या अंगाचा अगदी तिळपापड होऊन जाई. तो त्रिवेलचा अत्यंत द्वेष करी. त्रिवेलच्या भव्य प्रासादाचे अंगण सकाळी सहापासून नखशिखान्त शस्त्रे धारण करणाऱ्या शिलेदारांनी गजबजून जाई. शूर लोक त्रिवेलची आज्ञा होताच कोणतीही गोष्ट करण्यास मागे-पुढे पाहात नसत. एक मोठा प्रशस्त जिना त्रिवेलच्या दुसऱ्या मजल्यावरील बैठकीच्या खोलीकडे जाई. खोलीच्या बाहेर भेटावयास आलेल्या लोकांना बसण्यासाठी म्हणून बाके ठेवलेली असत. आपल्या बसावयाच्या खोलीत तो आलेल्या लोकांच्या गाठी-भेटी घेई, त्यांची गाऱ्हाणी ऐके व योग्य त्या आज्ञा देई. खोलीच्या खिडकीतून अंगणात जमा झालेले त्याचे सर्व शिलेदार त्याच्या सहज दृष्टिपथात येत.

त्रिवेलच्या प्रशस्त प्रासादाच्या प्रचंड दारातून डार्टा आत येताच त्याच्याभोवती शिलेदारांचा गराडा पडला. पटांगणात एकच दंगल माजून राहिली होती. हास्य-विनोद, ढकला-ढकली, टिंगल ह्यांना नुसता ऊत आला होता. शिलेदारांचा हा धुमाकूळ पाहून डार्टाला आयुष्यात प्रथमच आपल्या कमीपणाची जाणीव झाली. त्याच्या मनात स्वत:विषयी एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण झाला. शिलेदार आपणाकडे पाहून हसत आहेत असा निष्कारण त्याला भास होऊ लागला. ह्या गर्दीतून मार्ग काढता काढता त्याचा जीव अगदी घाबरा होऊन गेला. जिन्यापाशी येताच त्याने एकदा सुटकेचा नि:श्वास टाकला, पण तेथे त्याच्यापुढे दुसरेच एक संकट वाढून ठेवले होते. वरच्या पायरीवर हातात नग्न तरवार घेऊन एक शिलेदार उभा होता व तो आपल्या खालील तीन सवंगड्यांना रोखून धरण्याचा खेळ खेळत होता. हा खेळ पाहात आणखी कित्येक शिलेदार तेथे उभे होते. ह्यातील कोणी दुखापत होऊन बाद झाल्यास त्याची जागा घेण्यासाठीही कित्येकजण सज्ज होऊन बसले होते. उत्साहाच्या व हर्षाच्या आरोळ्यांनी अंगण दुमदुमून गेले होते. आऽवासून चमत्कार पाहात बसण्यावाचून डार्टाला गत्यंतरच नव्हते. तरवार चालविण्याचे हे कौशल्य अद्यापि त्याला कधीच पाहावयास सापडले नव्हते.

पाच एक मिनिटांतच वरच्या मनुष्याने आपल्या तीन

मित्रांना हतबल केले आणि डार्टाला वर जाण्यास कशी बशी एकदाची वाट मिळाली. एका गोष्टीचे मात्र त्याला विशेष आश्चर्य वाटले आणि ती म्हणजे त्रिवेलच्या वाड्यात कार्डिनल हा एक थट्टेचा विषय होता ही होय. डार्टाच्या बापाने त्याला कार्डिनलविषयी आदर बाळगण्यास सांगितले होते आणि येथे तर त्याची थट्टा चालू होती! हंशा पिकविण्याचे एक साधन म्हणून कार्डिनलचा विषय येथे चर्चिला जात होता. डार्टाचा नवखा चेहरा शिलेदारांच्या दृष्टीतून सुटला नाही. एका शिलेदाराने त्याला हटकले व त्याच्या कामाची चौकशी केली. त्रिवेलला भेटण्यास आपण आलो असल्याचे डार्टाने सांगताच त्याने त्याला त्याजकडे पोहोचविण्याचे काम पत्करले व बोलावणे येईपर्यंत वेळ काढण्यासाठी म्हणून डार्टा इकडे तिकडे पाहू लागला.

वरच गप्पा मारीत उभ्या असलेल्या शिलेदाराच्या घोळक्यात एक भला उंच शिलेदार उभा होता. त्याची मुद्रा गर्विष्ठ व तापट दिसत होती. त्याने सोनेरी नक्षीचा कमरपट्टा बांधला असून त्यात ऐटदार तरवार अडकविली होती व जांभळा झुब्बा अंगावर घेतला होता. त्यावर बनातीचे काम केलेले होते. पहाऱ्यावरून तो नुकताच परत आला होता व सरदी झाल्याची सवंगड्याजवळ कुरकुर करीत होता. आपल्या कुरकुरीच्या समर्थनार्थ तो मधून-मधून खोकतही होता. त्याची मित्रमंडळी त्याच्या सोनेरी कमरपट्ट्यावर टीका करून त्याच्या बुडाशी काही नाजुक रहस्य आहे का ह्याचा सुगावा काढण्याचा प्रयत्न करीत होती.

''पार्था, पण हा सुबक पट्टा तू कुठून पैदा केलास ते तरी सांग.'' ते म्हणत होते.

''ह्याला काय भारी मोल दिलं आहे माहीत आहे तुम्हाला? विचारा अरामीला म्हणजे समजेल.''

'अरामी' हा एक बावीस वर्षांचा तरुण शिलेदार होता. तो बांध्याने जरा नाजूकच असून त्याचे डोळे काळेभोर होते. मिशा काळ्या व टोकदार होत्या. केस, दात, हातांची बोटे ह्यांची निगा तो परिश्रमपूर्वक राखीत असावा असे दिसत होते. त्याचे भाषण नम्र असून हसण्याची पद्धतही मोठी मोहक होती. पार्थाच्या भाषणाला त्याने मान हलवून संमती दिली व पट्ट्याचा विषय तेथेच थांबला. इतक्यात एक नोकर बाहेर आला व ओरडला, ''डार्टा कोण आहे? मॉन्सिर द त्रिवेल त्याची वाट पाहात आहेत.''

डार्टाने खोलीचा रस्ता सुधारला व थोडा वेळ सर्व शिलेदार स्तब्ध झाले.

●●●

## ५. तीन शिलेदार

डार्टाने खोलीत प्रवेश केला त्या वेळी त्रिवेलची मुद्रा जरा त्रासिकच दिसत होती. पण डार्टाचे स्वागत करताना मात्र त्याने तसे दाखविले नाही. त्याच्या स्वागताला डार्टाने विनयपूर्वक प्रणाम करून उत्तर दिले. त्याच्या वागण्याची एक विशेष ढब पाहून त्रिवेलच्या मुद्रेवर स्मित झळकू लागले. त्याला आपल्या तरुणपणची आठवण झाली. तो प्रथम पॅरिसला आला त्या वेळी अगदी बरोबर अस्साच वागला. डार्टाच्या आगमनाने आज त्याला फिरून आपल्या पूर्वायुष्याची स्मृती झाली.

''जरा क्षणभर थांब हं'' असे म्हणून त्रिवेल उठला व कोणाला तरी हाक मारावयाची असल्याप्रमाणे दारापाशी आला.

''ऑथा पार्था अरामी!''

नुकतेच डार्टाने बाहेर पाहिलेले दोन शिलेदार आत आले. पाठोपाठ त्यांनी खोलीचा दरवाजाही लावून घेतला.

पार्था आणि अरामी ताठ उभे होते. त्रिवेल खोलीत इकडून तिकडे अस्वस्थपणे येरझारा घालीत होता.

''सभ्य गृहस्थ हो, काल संध्याकाळी राजेसाहेब

मजजवळ काय म्हणाले, मला काय बोलले, हे तुम्हाला माहीत आहे काय?'' तो ओरडला.

''नाही महाराज!'' शिलेदार हळूच म्हणाले, ''आम्हाला काहीच माहीत नाही.''

''ते मला म्हणाले, ह्यापुढं त्यांचे खासे शिलेदार कार्डिनलच्या पथकातून निवडले जातील; आमच्या नाहीत.''

''कार्डिनलच्या पथकातून? आणि ते काय म्हणून?'' पार्था ओरडला.

''कारण आमच्या शिलेदारांना कसं वागावं हेच मुळी माहीत नाही असं त्यांचं म्हणणं आहे. कार्डिनलनं राजेसाहेबांना सांगितलं आहे की, त्याच्या शूर वीरांनी काल कुठल्याशा पानगृहात दंगल माजविणाऱ्या पुंडांना पकडलं आणि ते पुंड दुसरे-तिसरे कोणी नसून माझे शिलेदार होते. बोला, ह्यातला खरा प्रकार काय आहे? तुम्हाला ह्यातली काही माहिती आहे? हा माझाच दोष आहे बाकी. कारण माझी माणसं मीच निवडतो ना? अरामी, शिलेदाराचा पोषाख घालण्यापेक्षा तुम्ही एखाद्या पाद्र्याचा झगा अंगावर घातला असतात तर अधिक बरं झालं असतं. आणि पार्था, तुम्ही ह्या सुंदर पट्ट्यात ती निरुपयोगी तरवार अडकविण्याचे परिश्रम उगीच घेतलेत. आणि ऑथा! ऑथा कुठं आहेत? मला ते इथं कुठं दिसत नाहीत!''

''महाराज,'' अरामी अत्यंत दु:खित आवाज काढून म्हणाला, ''ते अतिशय आजारी आहेत.''

''आजारी? काय झालं आहे त्यांना?''

''बहुदा देवी असाव्यात.'' पार्था म्हणाला.

''देवी आणि ह्या वयात? नाही, नाही, ही तुमची थापेबाजी मी चालू देणार नाही. ते जखमी झाले असतील किंवा मारलेही गेले असतील; पण देवीनं ते खचित आजारी नाहीत. कालच्या दंगलीचा हा परिणाम आहे. तुम्ही सडकेवर चालविलेले हे दंगे ह्याच्यापुढे बंद झाले पाहिजेत! कार्डिनलच्या रक्षकांनी माझ्या शिलेदारांची बेअब्रू करावी, त्यांना प्रकटपणे हास्यास्पद ठरवावं, हे मला खपणार नाही. कार्डिनलकडून पकडलं जाण्यापेक्षा ते मरण का पत्करीत नाहीत? तुम्ही काल पळून गेलात काय? राजशिलेदारांना हे शोभतं असं तुम्हाला वाटलं काय?''

अरामी व पार्था ह्यांनी क्रोधाने ओठ चावून भुईवर पाय आपटले. बाहेर उभे राहिलेले शिलेदार दाराला कान लावून मोठ्या उत्सुकतेने त्रिवेलचे भाषण ऐकत होते. त्याने पार्था व अरामीची काढलेली खरडपट्टी ऐकून त्यांचा कार्डिनल विषयीचा संताप चांगलाच भडकला व ते आपापसात कुजबुजू लागले.

''कार्डिनलच्या सहा रक्षकांनी माझ्या सहा शिलेदारांना हतबल करून पकडावं? आता राजीनामा देऊन मोकळं होण्यापलीकडे मला गत्यंतरच राहिलं नाही.'' त्रिवेल फिरून रागाने बडबडला.

त्रिवेलच्या या भाषणाने बाहेरच्या शिलेदारात एकच गडबड उडाली. त्यांची गडबड आता आत ऐकू येऊ लागली. पार्थालाही पण आता आपला राग आवरणे अशक्य झाले.

''साहेब,'' तो म्हणाला, ''आम्ही सहाला सहा होतो ही गोष्ट खरी; पण आम्हाला काही सरळ मार्गानं पकडण्यात आलं नाही. त्यात दगाबाजी होती. आमच्या तरवारी म्यानातून बाहेर पडण्यापूर्वीच मारेकऱ्याप्रमाणं आमच्यातील दोघांचे खून करण्यात आले व ऑथाना भयंकर जखम झाली. त्यांनी दोनदा उठण्यासाठी धडपड केली; पण त्यांना ते शक्य झालं नाही व त्यामुळे ते मेले अशी कार्डिनलच्या दूतांची कल्पना झाली. त्यांना बेशुद्ध स्थितीत तसंच टाकून देण्यात आलं. उरलेल्या आम्हा तिघांना ओढून नेण्याचा त्यांनी प्रयत्न केला, पण आम्ही आमची सुटका करून घेतली.''

''माझी तरवार आधीच मोडली, तरी मी त्यातील एकाला ठार केलंच.'' अरामी मध्येच म्हणाला.

''मला हा प्रकार काहीच माहीत नाही.'' त्रिवेल जरा शांतपणाने म्हणाला, ''कार्डिनलनं माझी जरा दिशाभूल केली म्हणावयाची मग!''

इतक्यात एक भला उंच व भव्य शिलेदार आत आला. आजारातून उठल्याप्रमाणे तो अगदी फिक्कट दिसत होता. डार्टा त्याच्याकडे निरखून पाहात होता. ह्या नव्या शिलेदाराने त्याचे लक्ष चांगलेच वेधून घेतले होते.

''ऑथा!'' अरामी व पार्था ह्या नव्या शिलेदाराला पाहून एकदम ओरडले.

''ऑथा!'' त्रिवेल म्हणाला.

''महाराज, आपण मला बोलावणं पाठवलं होतंत? आपली आज्ञा ऐकण्यासाठी म्हणून मी तत्काळ आलो आहे.'' मंद पण स्पष्ट व शांत आवाजात ऑथा म्हणाला.

ह्या शिलेदाराचे असामान्य धैर्य त्रिवेल ओळखून होता. तो त्याच्यापाशी येऊन म्हणाला,

''माझ्या शिलेदारांनी आपले जीव निष्कारण धोक्यात घालू नयेत हे सर्वांना मी आज सांगणार होतो. शूर माणसं राजेसाहेबांना अत्यंत प्रिय आहेत आणि त्यांचे शिलेदार शूर आहेत हेही ते जाणतात. पण ऑथा, तुमचा हात कसा काय आहे?''

त्रिवेलने त्याचा हात आपल्या हाती घेऊन प्रेमभराने दाबला. आतापर्यंत दाराशी गर्दी करून उभे असलेले शिलेदार दार उघडून एकदम आत घुसले व त्यांनी ऑथाभोवती एकच गर्दी करून सोडली. जखमांच्या वेदनांनी विव्हळ झालेला ऑथा ह्या लोंढ्यापुढे काय टिकाव धरणार! ह्या थोड्या-फार श्रमाने तो कासावीस होऊन धाडकन् भुईवर पडला.

''जा, जा, धावा कोणीतरी आणि एका उत्तम वैद्याला घेऊन या; नाही तर माझ्या शूर ऑथाच्या जिवाला अपाय होईल!'' त्रिवेल एकदम ओरडला. तेथे एकच दंगल उडून राहिली. आरडा ओरड व धावपळ सुरू झाली. वैद्य येताच प्रथम त्याने सर्वांना हाकलून बाहेर काढले व मग ऑथाच्या जखमांवर औषधोपचार चालू केले. थोड्याच वेळात ऑथा शुद्धीवर आला.

ऑथाच्या प्रकरणाने निर्माण झालेली अस्वस्थता नाहीशी होऊन सर्व शांत होताच डार्टा त्रिवेलच्या पुढे येऊन उभा राहिला. मध्यंतरीच्या धांदलीत त्रिवेल त्याचे आगमनच विसरून गेला होता. त्याला पाहून त्रिवेल म्हणाला, काय पाहिजे आपणाला?'' डार्टाला फिरून एकदा आपला पाढा वाचावा लागला आणि मग त्रिवेलच्या ध्यानात सर्व प्रकार आला. ''अरे! मी तुम्हाला अगदीच विसरलो. क्षमा करा हं. मी तुमच्या पित्याला पूर्ण ओळखतो. मी तुमच्यासाठी काय करावं असं तुमचं म्हणणं आहे?'' त्रिवेलने विचारले.

''मला शिलेदार होण्याची इच्छा आहे.'' डार्टाने उत्तर दिले.

''माझ्या पथकाव्यतिरिक्त कुठल्या तरी सामान्य पथकात दोन वर्ष लष्करी उमेदवारी केल्यावाचून तुम्हाला एकदम शिलेदार म्हणून कसं घेता येईल बरं? त्या ठिकाणी तुमचं शौर्य राजेसाहेबांच्या निदर्शनाला आल्यास शिलेदारपथकासाठी त्यांच्याकडूनच तुमची निवड होईल.''

त्रिवेलचं भाषण ऐकून डार्टाची जवळ-जवळ निराशा झाली. शिलेदार होण्याचा त्याचा उत्साह बराचसा मावळला.

''तुमच्या पित्याचा व माझा स्नेहच असल्याने मी तुमच्यासाठी काही निश्चितच करीन. सरकारी लष्करी शाळेत प्रथम काहीही खर्च न येता तुमच्या शिकण्याची सोय आधी लावून देतो. वरचेवर माझी गाठ घेऊन तुमचं कसं काय चाललं आहे तेवढं मात्र मला कळवीत जा.''

डार्टाचे ह्यानेही फारसे समाधान झाले नाही. त्रिवेल आपणास एखाद्या तिऱ्हाईत गरीब माणसाप्रमाणे वागवीत आहे असे त्याला वाटले. आपल्या स्नेह्याचा मुलगा ह्या दृष्टीने तो आपणाकडे पाहात नाही ह्याचे त्याला वाईट वाटले.

''माझ्या पित्यानं मला दिलेलं पत्रच हरवलं; नाही तर आपणास माझ्या येण्याचा हेतू चांगल्या रितीने समजून आला असता.'' तो पुटपुटला.

''इतक्या लांब तू एखादं पत्र घेतल्यावाचून आलास ह्याचं मलाही जरा आश्चर्य वाटत होतंच. मग एकंदरीत तुझं पत्र हरवलं म्हणतोस?''

''हरवलं नाही. ते चोरीलाच गेलं!'' एवढे म्हणून त्याने त्रिवेलला प्रवासात घडलेली सर्व हकीकत सांगितली.

''हे सारंच मोठं चमत्कारिक दिसतं. तू ह्या प्रकरणी माझ्या नावाचा उच्चार केला होतास म्हणतोस?''

''होय महाराज, तुमच्या नावाचा मला मोठाच उपयोग होईलसं वाटलं म्हणून मी तसं केलं.''

त्रिवेलला डार्टाच्या ह्या भाषणाने हसू आले. पण आपले हसू जरा आवरून त्याने विचारले, ''बरं, मला सांग, त्या माणसाच्या गालावर एखादा मोठा वण होता का?''

''हो.''

''तो उंच असून फिकट गोरा होता का? त्याचे केस काळे होते का?''

''होय! होय!! तुम्ही त्याला ओळखता काय? तो कोण मला सांगा. मला त्याचा सूड घ्यावयाचा आहे. मग मला तुमची शिलेदारी नाही मिळाली तरी चिंता नाही. पण तो एकदा माझ्या हाती लागला पाहिजे.''

''जरा दमानं घे पोरा!'' त्रिवेल म्हणाला, ''तुझा केव्हाच तो चुरा करून टाकील. तो ह्या सडकेला दिसला तर तू त्या सडकेनं जात जा.''

''ह्यानं मी भिणार नाही. त्याला आज ना उद्या मी गाठल्यावाचून राहाणार नाही!''

''जा, भलत्या नादाला लागू नको. सध्या मी तुला एक पत्र देत आहे ते घे. ते घेण्यात तुला कमीपणा वाटण्याचं कारण नाही. आणि त्या माणसाला विसर. तुला तो आटोपणार नाही.''

''ठीक आहे महाराज. आता मात्र ह्या पत्राला मी विसंबणार नाही. एक धडा मिळाला तेवढा पुरे आहे.''

त्रिवेल पत्र लिहीत असता डार्टा खिडकीतून बाहेर पाहात उभा होता. त्रिवेल पत्र पुरे करून डार्टाच्या हाती ते आता देणार, तोच डार्टाने दरवाजाकडे धाव घेतली व तो ओरडला, ''पाहातो चोर आता माझ्या हातातून कसा सुटतो ते!''

''कोण, कोण तो?'' त्रिवेल ओरडला.

''तोच तो चोर!'' असे म्हणत डार्टाने बाहेर धूम ठोकलीच.

●●●

## ६. विकतचे श्राद्ध

दोन-तीन उड्यांतच डार्टाने माडी ओलांडून जिना गाठला व धाड् धाड् चार-चार पायऱ्या उतरत तो तळमजल्यावर आला. ह्या त्याच्या धांदलीत त्याने सरळ-सरळ एका शिलेदाराला बेधडक टक्कर दिली. डार्टाची मुसंडी लागून तो शिलेदार चांगलाच कळवळला.

''क्षमा करा हं, मी जरा धांदलीत आहे.'' डार्टा धावताधावताच ओरडला. इतक्यात त्याचा कमरपट्टा एका बळकट हाताने पकडला गेला. तो फिकट उंच भव्य शिलेदार त्याला खेचून म्हणाला, ''भल्या गृहस्था, धांदलीत आहे ह्या सबबीवर खुशाल दुसऱ्याला धडक मारून पुढं पळतोस काय? त्रिवेलनं आज तुझ्या देखत आमची खरडपट्टी काढली म्हणून शेफारलास काय? आमचा अपमान आता कोणीही करावा अशी तुझी कल्पना झालेली दिसते. याद राख! तू काही त्रिवेल नाहीस!''.

ऑथाला डार्टाने तत्काळ ओळखले. वैद्याने त्याच्या जखमा नुकत्याच बांधल्या होत्या व तो घरी निघाला होता.

''मी अत्यंत घाईत असल्यानं माझा आपणांस धक्का लागला. ही गोष्ट बुद्धिपुरस्सर मी थोडीच केली आहे? कृपा करून मला आपण जाऊ द्यावं. माझं तसंच निकडीचं काम आहे. नाही तर मी आपला गैरसमज दूर केला असता.''

ऑथाने डार्टाला सोडून दिले. पण तेवढ्यावरच न थांबता तो पुढे म्हणाला, ''आपणात एकंदरीत शिष्टाचार जरा कमीच दिसत आहे. नवखे आहात म्हणून सोडून देतो झालं.''

पळत सुटलेल्या डार्टाच्या कानांवर ऑथाचे हे शब्द ओझरते गेलेच. तत्काळ वळून तो म्हणाला, ''आपणांकडून शिष्टाचाराचे धडे घेण्याइतपत मी असभ्य असेनसं मला वाटत नाही. मी आता एकाच्या मागे आहे, नाही तर...''

''अहो अतिसभ्य, मला हुडकण्यासाठी काही पाठलागाची गरज नाही. बोला, आपली गाठ-भेट कुठं होऊ दे. करू दोन हात.'' ऑथा रागाने ओरडला.

''बोला, तुम्हीच जागा सांगा; माझी तयारी आहे.''

''दुपारी त्या मठापाशी.''

''ठीक आहे. मी येत आहे तिथं.'' असे ओरडून डार्टाने आपल्या शत्रूला गाठण्यासाठी म्हणून फिरून धूम ठोकली.

बाहेर फाटकापाशी पार्था पहाऱ्यावर असलेल्या एका

शिपायाशी बोलत उभा होता. एक मनुष्य कसाबसा मधून जाईल एवढीच जागा त्या दोघांमध्ये होती. डार्टाने त्या दोघांमधून मुसंडी मारून जाण्याचा प्रयत्न केला. पण दुर्दैव त्याचे. वाऱ्याने पार्थाचा प्रचंड झुब्बा त्याच क्षणी उडाला व डार्टा त्यात गुरफटला. डार्टाची सुटका करण्यासाठी पार्थाने वस्तुत: झुब्बा सैल सोडावयास पाहिजे होता; पण उलट त्याने तो अधिकच खचाटून धरला. हिसका-हिसकीत आपला सोनेरी कमरपट्टा खराब होईल अशी त्याला भीती वाटत असावी. इकडे सुटकेसाठी डार्टाची धडपड चालू होतीच. पार्थाचा सोनेरी पट्टा बिघडू नये म्हणून डार्टा शक्यतो हळुवारपणे झुब्ब्याखालून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत होता, तर आपल्या नकली पट्ट्याची मागील चामड्याची बाजू डार्टाच्या दृष्टीस पडू नये म्हणून पार्थाची धडपड चालली होती. पार्था आपली सहज मुक्तता का होऊ देत नाही ह्याचे डार्टाला मोठे आश्चर्य वाटत होते. कमरपट्ट्याकडे त्याची दृष्टी जाताच मात्र पार्थाच्या धडपडीचा अर्थ त्याच्या ध्यानात आला. सोनेरी नक्षीने पुढील बाजूने चमकणारा त्याचा कमरपट्टा आतून निव्वळ कातडी होता. नकली कारभार होता तो सारा!

''दूर हो, दूर हो! दुसऱ्याच्या अंगावर धडका मारीत सुटलेला कोण मूर्ख मनुष्य आहे हा!'' पार्था ओरडला.

''माफ करा हं, मी घाईत आहे. एकाचा पाठलाग करण्याच्या नादात असल्यानं हा घोटाळा झाला.'' कशी-बशी मुक्तता करून घेत डार्टा म्हणाला.

''घाईत असल्यावेळी आपले डोळे कुठं केळी खावयास जातात काय?'' पार्थाने विचारले.

''नाही, तसं मुळीच नाही. उलट अशा वेळी इतरांना दिसत नाही तेसुद्धा मला चांगलं दिसतं.'' डार्टा त्याच्या कमरपट्ट्याकडे पाहात म्हणाला.

पार्था रागाने लाल होऊन ओरडला, ''शिलेदाराला धडक दिल्याबद्दल आपल्याला मला चांगली शिक्षा करावी लागेल!''

''शिक्षा? आपण जरा अधिक बोलता आहात; नाही?'' डार्टा जरा खवचटपणाने म्हणाला.

''अधिक? शत्रूला धूळ चारण्याची धमक असणाऱ्या शिलेदारांच्या बाबतीत अधिक असं काहीच असत नाही, महाशय!'' पार्था म्हणाला.

''ठीक, ठीक. काही अडचण नाही. मलाही आपल्या नकली पट्ट्याचं अवसान पाहावयाचं आहेच!'' पळता-पळता डार्टा ओरडला. पार्था त्याच्या मागे धावणार होता; पण इतक्यात डार्टा फिरून ओरडून म्हणाला,

''मी आपली गाठ केव्हा व कुठे घेऊ तेवढं सांगा मात्र!''

''मठाजवळच्या बगीच्यापाशी.'' पार्था ओरडला.

''दुपारी एक वाजता.'' डार्टा रस्त्याच्या कोपऱ्यावर वळता-वळता ओरडला. डार्टाने रस्त्यावर इकडून तिकडे पुष्कळ चकरा मारल्या. पण एव्हाना त्याचा शत्रू अदृश्य झाला होता. आता त्याला सकाळी घडलेले प्रसंग एकामागून एक आठवू लागले. आता कोठे नुकतेच अकरा वाजले होते. पण एवढ्या वेळात त्याने आपणावर अनेक संकटे ओढवून घेतली होती. त्रिवेलला न जुमानता पळ काढल्याने तो रुष्ट होण्याचा संभव होता. ऑथा व पार्था ह्यांच्याशी द्वंद्वयुद्धे खेळणे प्राप्त झाले होते; आणि त्या प्रत्येकाचे सामर्थ्य तीन डार्टांना पुरून उरण्याइतपत होते. त्याच्या डोळ्यांपुढे एकदम अंधार दिसू लागला. करावयास गेलो काय आणि झाले काय! ''जाऊदे. ऑथाच माझा मुडदा पाडील! मग पार्थाचा विचार करा कशाला!'' तो मनाशी म्हणाला.

''जर यदाकदाचित् दोन्हीही द्वंद्वात मला यश मिळालं, तर मात्र पुढे कधीही असला उपद्व्याप करायचा नाही. जरा विनयानं वागलं म्हणून काही बिघडत नाही. विनय म्हणजे काही भित्रेपणा नाही. ''आता अरामीच नाही का? त्याला भित्रा कोण म्हणेल? शिष्टाचार आणि सौम्यपणा ह्यांचा मूर्तिमंत पुतळा असूनही किती शूर आहे तो! बस्स. आपण ह्यापुढं त्याचंच उदाहरण पुढे ठेवून वागणार. वाऽ स्वारी उभी आहे तिथंच!'' डार्टाचे विचारचक्र अरामीला पाहून जरा थांबले.

डार्टाला आपण जणू पाहिलेच नाही असा बहाणा करून अरामी सडकेवर आपल्या चार-पाच मित्रांसमवेत गप्पा ठोकीत उभा होता. ह्या तिऱ्हाईत पोरसवदा तरुणादेखत त्रिवेलने सर्व प्रतिष्ठित शिलेदारांची खरड काढावी हे त्यालाही फारसे रुचले नव्हतेच. इकडे पूर्ण सभ्य बनण्याचे विचार डार्टाच्या डोक्यात घोळत होतेच. अरामीपाशी येऊन त्याने त्याला अगदी विनयपूर्वक अभिवादन केले. अरामीनेही पण आपली मान किंचित् लवविली; पण

तोंडावर मात्र स्मित मुळीच दिसू दिले नाही. तसेच डार्टा जवळ येताच सर्वांनी एकदम भाषण बंद केले ते निराळेच!

आपले आगमन येथे कोणालाच रुचले नाही हे डार्टाला समजण्यास मुळीच वेळ लागला नाही. पण आता तेथून निसटावे कसे हे मात्र त्याला समजेना. त्याला धड बोलताही येईना की एकाएकी तसेच निघूनही जाता येईना. इतक्यात अरामीच्या पायाखाली त्याला एक हातरुमाल दिसला. अरामीने चुकून आपल्याच पडलेल्या हातरुमालावर पाय दिला आहे अशी डार्टाची समजूत झाली व त्याला एक नामी संधी मिळाल्याप्रमाणे झाले. त्याने वाकून अरामीच्या पायाखालील रुमाल काढून घेतला व मोठ्या अगत्याने तो सुंदर कशिदा काढलेला हातरुमाल अरामीपुढे करून तो म्हणाला, ''महाराज, हा रुमाल आपला दिसतो आहे. चुकून हरवायचा. इतका सुंदर हातरुमाल असा हरवणं आपणास निश्चित मानवलं नसतं, नाही?'' अरामीने डार्टाच्या हातून खस्‌दिशी तो हातरुमाल हिसकावून घेतला. पण तत्पूर्वी त्यावरील सुंदर नक्षीकाम त्याच्या मित्रांच्या लक्षात आलेच.

''आऽहा'' त्यातील एकजण ओरडून म्हणाला, ''एवढा नाजूक हातरुमाल कोणाकडून पैदा केलास बुवा तू? ही देणगी मैत्रिणीची दिसते.''

अरामीचा चेहरा लाजेने जरा लाल झालाच; पण डार्टाचा रागही त्याला आला. तो आपल्या मित्राकडे वळून जरा सौम्यपणानेच म्हणाला, ''भले गृहस्थ हो, हा हातरुमाल माझा नव्हेच मुळी. हा पाहा माझा मजजवळ आहे. ह्या सद्‌गृहस्थानं तो उचलून आपणांपैकी कोणाकडेही दिला असता तरी चाललं असतं.

वस्तुत: तो हातरुमाल अरामीचा आहे ह्याविषयी डार्टाला शंका नव्हती. कारण त्याच्या हातून तो पडतानाच मुळी लांबून डार्टाला दिसला होता. अरामीच्या ह्या भाषणाने डार्टा चांगलाच खजिल झाला. पण अरामीची काहीतरी चुकीची समजूत झाली असावी असे वाटून त्याने फिरून पुस्ती जोडली, ''तुमच्या पायाखाली तो दिसला म्हणून मी तो तुम्हाला दिला असं नव्हे; मला वाटतं तो तुमच्याच हातातून पडला असावा!''

''आपण चूक करीत आहात.'' अरामी फिरून तुसडेपणाने म्हणाला व पुढे त्याने डार्टाकडे संपूर्ण दुर्लक्ष केले. डार्टा थोडा वेळ तेथेच घुटमळला. आपणाशी एक शब्दही न बोलता अरामी येथून जावयास निघालेला दिसताच मात्र त्याला राहवेना. तो हळूच म्हणाला, ''न कळत माझ्या हातून आपला काही प्रमाद झाला असल्यास क्षमा करा हं.''

''तरुण माणसा, उच्चकुलोत्पन्नाला अवश्य अशी वागणूक काही तुझ्या हातून घडली नाही ह्याविषयी मला वाईट वाटतं.''

''काय? काय? तुम्ही काय समजता....''

''माझी खात्री आहे की, गॅस्कनीमधून तुम्ही आला असला तरी अगदीच काही मूर्ख नाही. कारणावाचून पायाखाली हातरुमाल दडवून ठेवण्याइतके पॅरिसचे लोक काही मूर्ख नाहीत; अगदी उघड रितीनं तो रुमाल माझ्या स्वाधीन करण्याचं आपणाला काही कारण नव्हतं.''

''पण आपण तरी इतक्या निष्काळजीपणानं त्या रुमालाची एवढी विटंबना का चालविली होती?''

''मी एकदा सांगितलं ना, त्या हातरुमालाचा आणि माझा काही संबंध नाही म्हणून?''

''आपण खोटं बोलता महाशय, आपल्या हातांतून तो पडताना मी प्रत्यक्ष पाहिला आहे.''

''अरे गॅस्कन पोरा, माझ्याशी वाद घेतोस? शहरात कसं वागावं ह्याचा धडा तुला देणं मला आता अवश्य दिसू लागलं आहे.'' अरामी त्राग्याने म्हणाला.

खस्‌कन आपली तरवार उपसून डार्टा म्हणाला, ''होऊन जाऊ दे. इथंच शिकवा मला काय शिकवायचं आहे ते. काढा आपली तरवार!''

''नाही, इथं नाही. कार्डिनलच्या शिपायांच्या छावणीसमोरच आपण आता उभे आहोत हे तुला दिसत नाही काय? कदाचित् माझ्याशी भांडण उकरून काढण्याकरिता कार्डिनलनंच तुला पाठवलं असेल म्हणा! तुला ठार मारण्यात मला काहीच वाटत नाही. पण असं चवाठ्यावर नको. जरा शांत जागा काढू एखादी म्हणजे बरं! राजवाड्याच्या मागं ठीक दोन वाजता आपण भेटू.''

''ठीक आहे; पण अधिक घमेंडीत मात्र जाऊ नका हं. आणि तो हातरुमालही जरा जपून ठेवा. तो कोणाचा का असेना, पण आपल्याला एखाद्या वेळी गरज लागेल त्याची.'' डार्टा मिस्किलपणाने उत्तरला.

●●●

## ७. द्वंद्व

द्वंद्वयुद्धाचे आव्हान स्वीकारल्यानंतर आपल्यासह आपले एक-दोन स्नेही बघ्ये म्हणून घेण्याची प्रथा आहे. पण पॅरिसमध्ये डार्टाच्या ओळखीचे असे कोणीच नसल्याने त्याला एकटेच जाणे प्राप्त होते. मठाच्या मागे असलेल्या ओसाड पटांगणात दुपारी ठरल्याप्रमाणे तो उपस्थित झाला. ऑथा त्याच्या पूर्वीच येऊन त्याची वाट पाहात उभा होता. दोघांनीही अत्यंत विनयाने एकमेकांचे स्वागत केले व त्याच वेळी ऑथा आपल्या जखमांच्या वेदनांनी अद्यापि पिडलेला असावा हे डार्टाच्या लक्षात आले.

''मी माझ्या दोघां स्नेह्यांची वाट पाहात आहे. बहुधा ते उशीर करणार नाहीत.'' ऑथा म्हणाला.

''मला कोणीच स्नेही नाहीत, त्यामुळे माझा प्रश्नच नाही. मी पॅरिसमध्ये नवीनच असल्याने मॉन्सिर द त्रिवेल व्यतिरिक्त मला इथे कोणी ओळखतच नाही.'' डार्टाने आपल्या बाजूने खुलासा केला.

''तुझ्यासारख्या तरुणाचा जीव घेणं मला खरोखरीच दु:खद वाटतं.'' ऑथा सहानुभूतीने पुटपुटला.

''त्याविषयी वाईट वाटून घेण्याचं मुळीच कारण नाही. स्वत: प्राणांतिक जखमांनी व्याकूळ असताही तुम्ही मला आपल्याशी द्वंद्व खेळू देण्याचा मान दिलात ह्यातच मी स्वत:ला धन्य समजतो.''

''मला फार यातना होत आहेत ही गोष्ट मी अमान्य करीत नाही. तुमच्या धडकण्यानं तर मला असह्य वेदना झाल्या. पण जाऊदे. मी माझ्या उजव्या हाताइतकेच डाव्या हातानंही कसब दाखवू शकतो हे मी आपणास आधी बोललो आहेच.''

''आपल्या सूचनेबद्दल मी आपला आभारी आहे. पण हे पाहा, माझ्या आईनं मला जखमांवर एक अप्रतिम मलम दिलं आहे, ते आपण वापरल्यास तीन-चार दिवसांत आपल्या जखमा पूर्ण बऱ्या होतील. वाटल्यास नंतर आपण लढू. माझी त्याला आडकाठी नाही.'' डार्टा मोठा औदार्याचा आव आणून म्हणाला.

''आपल्या विनयशील सूचनेबद्दल मी अवश्य आपले आभार मानतो. मी तिचा स्वीकार केला नाही तरी तीमधील औदार्य आदरणीय मानतो. आपण हे द्वंद्व लांबणीवर टाकलं तर कुठून तरी कार्डिनलला त्याची वार्ता लागेल व मग ते आपणास खेळता येणार नाही. वाऽ हे पाहा आले माझे मित्र.'' ऑथा म्हणाला.

डार्टा तिकडे पाहातो तो काय, पार्था आणि अरामी ऑथाच्या वतीने स्नेही म्हणून पटांगणावर उभे! ''हेच तुमचे मित्र काय?'' त्याने मोठ्या आश्चर्याने विचारले.

''का? तुम्हाला ह्याचं एवढं आश्चर्य का वाटतं? आम्ही तीन शिलेदार कधीच एकमेकांस विसंबत नाही.'' ऑथा म्हणाला.

डार्टाला पाहून पार्था व अरामी हे दोघेही तितकेच आश्चर्यचकित झाले होते. कारण त्या दोघांनाही डार्टाशीच लढावयाचे होते. ह्यापुढे विशेष विलंब न करता डार्टा व ऑथा ह्यांनी आपापल्या तरवारी काढल्या. सलामी होऊन तरवारीला तरवार भिडली असेल नसेल, इतक्यात काही घोडेस्वार तिकडे दौडत येताना दिसले.

''कार्डिनलचे दूत!'' पार्था व अरामी एकदम ओरडले, ''सभ्य गृहस्थहो, तरवारी एकदम म्यान करा!''

पण ही सूचना मिळण्यास बराच विलंब झाला होता. कार्डिनलच्या दूतांना खरा प्रकार केव्हाच कळून चुकला होता. त्यांचा पुढारी 'जूसॅक' ह्याने आपला घोडा पुढे काढला व तो ओरडला, ''वाऽ फिरून तुम्ही इथं लढत आहात काय? द्वंद्वविरोधी कायदे मोडण्यासाठी आहेत काय? आधी तरवारी म्यान करा आणि चला माझ्यामागून. मला ह्यांचा बंदोबस्त केलाच पाहिजे!''

''आपली ही कर्तव्यदक्षता पाहून आम्हास फार आनंद होत आहे.'' अरामी त्याला वेडावून पुढे म्हणाला, ''जा, बाबा जा. आम्ही आमचं पाहून घेतो. तुझ्यामागून येण्याची मॉन्सिर द त्रिवेलची आम्हाला आज्ञा नाही.''

जूसॅकच्या रागाचा पारा ह्या उत्तराने चांगलाच चढला. ''तुम्ही जर ऐकणार नसाल तर मला तुमच्यावर हल्ला करावा लागेल.'' त्याने धमकाविले.

''हे लेकाचे पांचजण आहेत आणि आम्ही तिघेच आहोत; पण ह्याची आज्ञा ऐकण्यापेक्षा मेलेलं काय

वाईट?'' ॲॉथा पुटपुटला.

''आम्ही चौघे आहोत.'' डार्टाने त्याची चूक सुधारली.

''तुम्ही आमच्यापैकी कोठे आहात?'' पार्था म्हणाला.

''माझ्यापाशी शिलेदाराचा वेष नसला म्हणून काय झालं? माझी सहानुभूती सदैव त्यांनाच आहे.'' तरुण डार्टाने खुलासा केला.

''शाब्बास पठ्ठे!'' मोठ्या प्रेमाने त्याचा हात दाबून ॲॉथा म्हणाला, ''पण जरा अद्यापि कोवळा व अननुभवी आहेस रेऽ...''

''मी काय करतो ते मला जरा संधी देऊन पाहा तरी!''

''तरुण वीरा, तुझं नाव तरी काय?'' ॲॉथाने विचारले.

''डार्टा!''

प्रत्येकाने कार्डिनलच्या माणसांतून आपला जोडीदार हुडकून काढला. तरवारींच्या खणखणाटाने ते सर्व पटांगण थोड्याच वेळात दुमदुमून गेले. एकटा अरामी दोघांशी एकदम लढत होता, तर डार्टाने सरळ जूसॅकवरच धाव घेतली होती.

डार्टा इतक्या कसबाने ह्यापूर्वी कधी लढला होता की नाही कोण जाणे! जूसॅकवर त्याने नुसता चौफेर हल्ला चढविला होता. जूसॅक मुरलेला लढवय्या होता, पण डार्टाच्या चापल्याने तो गांगरल्यागत झाला व त्याच्या हातून चुका होऊ लागल्या. त्याच्या ह्या धांदलपट्टीचा डार्टाने पुरेपूर उपयोग करून घेतला. थोड्याच वेळात त्याने जूसॅकला पूर्णपणे लोळविले. आपले काम आवरताच त्याने आजूबाजूला आपल्या नवीन मित्रांकडे पाहिले. अरामीने आपल्या दोघा शत्रूंपैकी एकाला केव्हाच घायाळ केले होते व दुसऱ्याशी तो मोठ्या धिमेपणाने लढत होता. पार्थाने आपल्या शत्रूला जखमी केले होते. त्यालाही थोडी दुखापत झाली होती, पण तो त्याच्या आटोक्याबाहेर नव्हता. पार्थाला साहाय्याची आवश्यकता नव्हती. नंतर त्याने ॲॉथाकडे पाहिले. तो अद्यापि आपल्या शत्रूशी मोठ्या शौर्याने लढत होता; पण त्याच्या जखमांतून तेवढ्या श्रमाने बराच रक्तस्राव झाल्याने तो व्याकूळ झाल्यागत दिसत होता. डार्टाच्या साहाय्याची खरी आवश्यकता त्याला एकट्यालाच होती. एका उडीत तो ॲॉथापाशी येऊन पोहोचला.

''आव बेटा, इदर आव. नाही तर फुकट मरशील.'' डार्टा ॲॉथाशी लढणाऱ्या कार्डिनलच्या मनुष्याला ओरडून म्हणाला. ॲॉथा म्हणूनच इतका वेळ लढत होता. डार्टाने त्याच्या शत्रूला खेचताच तो धाडकन खाली पडला. ''त्याला ठार मारू नका.'' पडता-पडता त्याने डार्टाला विनविले, ''त्याला नुसतं नि:शस्त्र करा. त्याला मारण्याचा खरा अधिकार माझा आहे. त्याच्या एका जुन्या खोडीचा मला अद्यापि वचपा काढावयाचा आहे.'' डार्टाने हां-हां म्हणता आपल्या ह्या नव्या शत्रूची तरवार हवेत उडवून दिली व त्याला नि:शस्त्र करून खाली पाडले. एवढ्यात अरामीने आपल्या दुसऱ्या शत्रूचाही समाचार घेतला होता. तो त्याच्याकडे दयेची याचना करीत होता. एकटा पार्था मात्र अद्यापि लढत होता. त्याचा शत्रू चांगलाच दमदार गडी असावासे दिसत होते. हे बाळ आणखी तासभर लढले असते, पण शुद्धीवर आलेल्या जूसॅकने त्याला थांबण्याची आज्ञा केली.

झटापट संपताच ॲॉथा, पार्था व अरामी ह्यांनी डार्टाशी सांखळी करून मोठ्या डौलाने शहरातून चक्कर मारली. डार्टाचे अंत:करण तर हर्षाने नुसते फुलून आले होते. त्रिवेलच्या वाड्यात शिरता-शिरता तो आपल्या तीन मित्रांना म्हणाला, ''मी जरी अद्यापि शिलेदार नसलो, तरी माझ्या उमेदवारीला आरंभ तरी झकास झाला की नाही?''

● ● ●

## ८. राजा

कार्डिनलचे दूत व राजाचे शिलेदार यांच्यामधील झटापटीने शहरात अेकच खळबळ अुडून गेली. मॉन्सिर द त्रिवेलने आपल्या शिलेदारांना चार लोकांत जरी चांगले हासडले तरी खाजगी रीतीने त्यांना शाबासकी देण्यास कमी केले नाही. त्याप्रमाणे झटपट त्याने राजेसाहेबांकडेही धाव घेतली. सर्वांआधी आपणच लुअीच्या कानांवर हा प्रकार घालून मोकळे व्हावे हाही त्यात त्याचा अुद्देश होता, पण कार्डिनल त्याच्यापूर्वीच तेथे येअून पोहोचला होता व राजेसाहेब त्याच्याच भेटीत गुंतले असल्याचे त्यास कळून आले. नंतर त्याने फिरून सायंकाळी राजवाड्याकडे चक्कर मारली. या वेळी राजेसाहेब पत्ते खेळण्यात गुंतले होते. डावात सरशी असल्याने राजा मोठ्या समाधानीत होता. त्रिवेलला ही संधी बरी होती.

''या सेनापतीसाहेब,'' त्रिवेलचे त्याने स्वागत केले. ''मला तुमची जरा हजेरी घ्यायची आहे. तुमच्या शिलेदारांविषयी कार्डिनलनं फिरून नवी गाऱ्हाणी आणली आहेत हे तुम्हास माहीत आहे काय? ह्यामुळे त्या बिचाऱ्याचं मनःस्वास्थ्य अितकं बिघडून गेलं आहे की, संध्याकाळी तो अिकडे आलाही नाही. हे तुमचे शिलेदार म्हणजे भयंकर लोक दिसतात.''

''नाही महाराज,'' त्रिवेल म्हणाला, ''अुलट ते मोठे सालस लोक आहेत. कोकरांसारखे निरुपद्रवी आहेत. सरकारांच्या सेवेवाचून अितरत्र आपल्या तरवारी म्यानाबाहेर काढण्याची त्यांना माडीमात्र अिच्छा असत नाही. पण कार्डिनलची माणसं मात्र त्यांचं नाव काढण्यास सदैव टपलेली असतात. मग त्यांनी तरी काय करावं? आपल्या पथकाच्या अब्रूसाठी त्यांना लढणं भाग पडतं. माणसानं स्वसंरक्षण तरी केलं पाहिजे ना?''

त्रिवेलच्या या भाषणाने राजा फारच संतुष्ट झाला. झगड्याचा खरा वृत्तांत त्रिवेलच्या तोंडून अैकण्यासाठी त्याने आपला रंगात आलेला पत्त्यांचा डावही पुरा केला. ''न्यायाधीशानं दोन्ही बाजू अैकल्याच पाहिजेत,'' तो म्हणाला. त्रिवेलला तरी तेच पाहिजे होते. आपली तीन माणसे व गॅस्कनीतून नवीनच आलेला पोऱ्या डार्टा अशा चौघांनी कार्डिनलच्या पाच माणसांचा कसा धुव्वा अुडविला याचे रसभरीत वर्णन त्याने सविस्तरपणे राजापुढे केले. राजाची कळी त्यामुळे चांगलीच अुमलली.

''आपल्या शिलेदारांचा हा निःसंशय विजय आहे. चार विरुध्द पाच, आणखी त्या चारांत अेक जखमी आणि अेक तर निव्वळ पोऱ्या. पण हा पोऱ्या कोण? कुठला?'' राजाने प्रसन्न होअून विचारले.

''त्याचे नाव डार्टा. तो माझ्या अेका जुन्या मित्राचा मुलगा आहे.''

''आणि या पोरानं जूसॅकसारख्या ख्यातनाम योद्ध्याला लोळवलं? मॉन्सिर त्रिवेल, मला तर हे खरंच वाटत नाही.''

''महाराज, ही गोष्ट अक्षरशः खरी आहे. प्रथम हे लोक त्याला लढण्यास घेत नव्हते; पण तोच म्हणाला की, अंतःकरणानं मी शिलेदार आहे आणि राजेसाहेबांचा अेकनिष्ठ सेवकही आहे. मी तुमच्या बरोबरीनं लढल्याशिवाय राहणार नाही.''

''मॉन्सिर त्रिवेल, मला या तरुणाला पाहिलंच पाहिजे. त्याला घेअून तुम्ही अुद्या दुपारी अगत्य या.''

''महाराज त्याला अेकट्यालाच आणू काय?''

''नाही, नाही. त्या चौघांनाही घेअून या. मला त्यांना शाबासकी द्यावयाची आहे. अेकनिष्ठ माणसांचा गौरव झालाच पाहिजे.''

सायंकाळी तीनही शिलेदारांना ही आनंददायक बातमी कळली. राजेसाहेबांनी आपला गौरव करण्याचे योजिलेले पाहून त्यांना धन्यता वाटली. डार्टा मात्र जरा बिचकला. कारण राजापुढे जाण्याचा हा त्याचा पहिलाच प्रसंग होता. बाकीचे तिघेजण त्या कामात जरा सरावलेले होते. डार्टाला मात्र जेवण रुचेना, झोप येअीना. पॅरिससारख्या शहरात नवखे आलेले खेडवळ पोर राजवाड्यात राजेसाहेबांपुढे जाअून अुभे राहायचे म्हणताच चांगलेच बावचळले. अितक्या आकस्मिकपणे आपण वर येअू असे त्याला कधीच वाटले नव्हते. साऱ्या गोष्टी मोठ्या चमत्कारिक रितीने जुळून आल्या खऱ्या!

शेवटी अेकदा वाड्यात जाण्याचा क्षण आला. ऑथा,

पार्था व अरामी यांच्या मागोमाग डार्टा हळूच राजेसाहेबांच्या खोलीत शिरला. ''या शूर वीरांनो, असे आत या.'' त्यांचे स्वागत करून राजा पुढे म्हणाला,

''कार्डिनलच्या दूतांना मारपीट केल्याबद्दल तुमची अेकदा चांगली हजेरीच घेतली पाहिजे मला. -आणि जूसॅकला जखमी करणारा तो गॅस्कन पोऱ्या कुठं आहे? हाच का तो?''

''होय महाराज!'' त्रिवेल विनयाने म्हणाला.

''एवढंच काय, पण चौसॅकच्या हातूनही माझी सुटका त्यानंच केली.'' ऑथा मोठ्या अगत्याने म्हणाला.

राजाने फिरून सर्व वृत्तांत मोठ्या आस्थेने अैकला. कार्डिनलच्या दूतांच्या फजीतीचे तेच वर्णन फिरून अैकतानासुध्दा त्याला मोठा आनंद होत होता. शेवटी तो म्हणाला,''बरा काटा काढलात लेकाच्यांचा. आता मात्र हे झगडे बंद करा. मला वाटतं तुमचं आता पुरं समाधान झालं आहे.''

''राजेसाहेबांचं झालं असल्यास आमचा प्रश्नच नाही.'' त्रिवेल म्हणाला.

''मी संतुष्ट झालोच आहे,'' असे म्हणत राजाने चाळीस सुवर्णमुद्रिका डार्टाच्या हातात ओतल्या व तो पुढे म्हणाला, ''मॉन्सिर त्रिवेल, तुमच्या शिलेदार पथकात आता जागा नसल्यास तुमच्या मेव्हण्याच्या, मॉन्सिर डेकार्टच्या संरक्षक दलात या तरुणाला जोडून द्या. कार्डिनल संतापेल, पण मला त्याची क्षिती नाही. योग्य दिसेल ते मला केलंच पाहिजे.''

●●●

## ९. मॉन्सिर बॉन्सिअ

वाड्यातून बाहेर पडताच डार्टाने आपल्या तिघा मित्रांत राजाने दिलेली रक्कम वाटून दिली. प्रत्येकाला दहाप्रमाणे सुवर्ण नाण्यांची वाटणी झाली. आपल्या पैशाचा काय विनियोग करावा हा प्रश्न डार्टापुढे होताच. त्याच्या तिघा मित्रांनी अेकमताने त्याला प्रथम एक नोकर ठेवण्याचा सल्ला दिला. पार्थाने प्लाँशे नावाचा एक पोऱ्या हुडकून काढला व डार्टाने त्याला आपला नोकर म्हणून ठेवून घेतले. हातात पैसे होते तोपर्यंत चारही मित्र आपल्या नोकरांसुध्दा मजेत राहिले होते. पण पुंजी संपताच ह्यापुढे पैसे कसे मिळवावे हा प्रश्न डार्टाप्रमाणे अितरांनाही पडला. त्यांचा शिलेदारी खाक्या अितक्या रुबाबात कसा चालू राहावयाचा हा मोठा प्रश्नच होता.

एके दिवशी प्लाँशेने अेक बुटका गृहस्थ डार्टाच्या खोलीत आणून सोडला. अंगानेही तो चांगला जाडजूड होता. डार्टाने त्याचे स्वागत करून त्याला बसण्याची विनंती केली.

''मॉन्सिर डार्टा, तुम्ही मोठे शूर गृहस्थ आहात असे मी अैकतो.'' तो बुटका माणूस बोलू लागला, ''आणि म्हणूनच तुम्हाला मी एक गुप्त गोष्ट सांगावी म्हणतो.''

''काही अडचण नाही.'' डार्टा म्हणाला.

''माझी बायको राणीसाहेबांची दर्जीण म्हणून आहे. मोठी सुंदर आणि अुद्योगी आहे ती.''

''छान!''

''आपल्या काम करण्याच्या खोलीतून बाहेर येताच काल तिला पळविण्यात आलं आहे.'' तो गृहस्थ मोठ्या अधीरतेने म्हणाला.

''छेऽ छेऽ तसं नसेल. असलं घाणेरडं काम कोण करील?'' डार्टा म्हणाला.

''मला नक्की जरी सांगता आलं नाही, तरी मला एका माणसाचा मोठा संशय आहे. बहुधा त्याचंच हे काम असावं. आज कित्येक दिवस हा गृहस्थ तिच्या मागावर आहे. राणीसाहेबांचा आणि हिचा घनिष्ठ संबंध त्याला माहीत आहे. राजदरबारच्या काही गुप्त गोष्टी कळल्या तर पाहावं म्हणूनच बहुधा त्यानं हे काम केलं असावं.

राणीसाहेबांचा खाजगी कारभारी  ला पोर्ट याची ती मानसकन्या आहे आणि त्यानं तिला ती जागा मिळवून दिली आहे. राणीसाहेबांच्या खास विश्वासातील नि मैत्रीतील ती आहे. राणीसाहेबांना या कार्डिनलनं आपल्या कारस्थानांनी जीव नकोसा करून सोडला असल्यानं त्याना विरंगुळा असा नाही. राणीसाहेब फ्रान्सविरुध्द अिंग्लंड स्पेनशी सूत्र बांधीत असाव्यात असा संशय घेण्यापर्यंत ह्या वृध्द कपीची मजल गेली आहे आणि यामुळं मला माझ्या बायकोविषयी अधिकच काळजी वाटते. स्वतः राजेसाहेबांच्या मनातही  त्यानं राणीविषयी संशय निर्माण करून ठेवला आहे.''

''हे सारं तुम्हाला कसं कळलं?'' डार्टाने विचारले.

''ला  पोर्टनं माझ्या बायकोला सांगितलं व चार दिवसांपूर्वी ती अिथं भेटण्यास आली असता तिनं मला सांगितलं. राणीसाहेबांना असंही कळलं आहे की, त्यांच्या नावानं अिंग्लंडमध्ये ड्यूक ऑफ बकिंगहॅमला कुणीतरी पत्र पाठवलं आहे. त्यामुळं तर त्या अगदीच घाबरून गेल्या आहेत. ते पत्र खरं समजून राणीसाहेबांवरील प्रेमानं ड्यूकसाहेब इथं पॅरिसला यायचे व त्यांच्या शत्रूंनी रचून ठेवलेल्या सापळ्यात आयतेच सापडायचे!''

''पण या साऱ्या भानगडींशी तुमच्या पत्नीचा संबंध तरी काय?'' या साऱ्या प्रकरणाने घोटाळ्यात पडलेल्या डार्टाने विचारले.

''राणीसाहेबांची ती खास मैत्रीण असल्यानं त्यांची रहस्यं तिला माहीत असावीत हे मघाशीच मी तुम्हाला सांगितलं नाही का? तिला पकडून तिच्याकडून ती समजून घेण्याचा त्यांचा मानस असावा, दुसरं काय?''

''आलं लक्षात! ज्या माणसाचा तुम्हाला संशय येतो त्याला तुम्ही कधी पाहिलं आहे काय?''

''माझ्या बायकोनं मला तो एकदा दाखविला होता. तो चांगला उंच असून त्याचे केस काळे आहेत. त्याचे डोळे चमकदार असून त्याच्या गालावर एक भला मोठा वण आहे.''

''उंच? गालावर वण? मग मिअंगला मी पाहिलेला तोच हा मनुष्य!'' डार्टा आश्चर्याने ओरडला.

''मिअंगचा मनुष्य!'' डार्टाच्या त्या बडबडीने बुचकळ्यात पडून तो मनुष्य आश्चर्याने पुटपुटला.

''होय, होय! मिअंगचा मनुष्य! मी आज बरेच दिवस त्याला हुडकीत आहे. तो सापडू दे मला. एका घावात आपल्या दोघांचाही सूड एकदमच उगवून घेतो!''

''तो कसा सापडणार हाच प्रश्न आहे. राजवाड्यातून बाहेर पडताना माझ्या पत्नीनं मला तो दाखविला. राजवाड्यातच चालला होता.''

''आणि त्याच्याविषयी यापलीकडे तुम्हास काहीच माहिती नाही?''

''मला सकाळी एक पत्र मिळालं आहे, तेही बहुधा त्यानंच पाठवलं असावं.'' असे म्हणून त्याने डार्टाच्या हाती एक चिटोरे दिले. डार्टा वाचू लागला, ''बायकोला हुडकण्याच्या नादाला लागू नको! योग्य वेळी ती घरी येईल. तिला हुडकण्यासाठी फाजील गडबड केलीस तर धोक्यात येशील.''

''ही तर निव्वळ धमकी आहे.'' डार्टा म्हणाला.

''पण मला तर भीती वाटते. कुठं तरी तुरुंगात-बिरुंगात डांबून घेण्याची पाळी यायची नाही तर!'' तो बुटका घाबरून म्हणाला.

''मला तरी कुठं तुरुंगात पडण्याची हौस आली आहे? -आणि हे तर विकतचं श्राध्द.''

''महाराज, माझं नाव बॉन्सीअ आणि......''

''बॉन्सिअ हे नाव तर मला परिचित दिसतं.'' डार्टा म्हणाला.

''होय, महाराज. मी ह्या घराचा धनीच आहे. आज तुम्ही जवळजवळ तीन महिने इथं आहात, पण मी एकदाही तुम्हाला भाड्याचा लकडा लावला नाही आणि माझ्या पत्नीचा आपण शोध लावून दिलात तर मी तो कधीच लावणार नाही. सध्या तुम्हाला पैशाची अडचण असेलच असं मला म्हणवत नाही, पण असलीच तर मात्र भीड धरू नका. मी तुम्हाला अवश्य हातभार लावीन.''

''मी तुमचा याबद्दल आभारी आहे. मी सध्या पैशाच्या अडचणीत आहेच. आपण जरा गबरच दिसता.''

''आहे, खाऊन पिऊन सुखी आहे झालं.''

''अरे, थांबा. तो कोण पाहिलात का?'' डार्टा एकदम ओरडला.

''कुठं? कुठं?''

''तो - तो पाहा आपल्या खिडकीसमोरच. त्याच्या अंगावर मोठा झुब्बा आहे तो....''

''तोच तो!'' बॉन्सिअ ओरडला व डार्टानेही मिअंग येथील आपल्या शत्रूला लागलीच ओळखले. तो ओरडून म्हणाला, ''आता मात्र तो माझ्या हातून खचित सुटू शकत नाही.'' त्याने आपली तरवार उपसली व एकदम रस्त्याकडे धाव घेतली.

●●●

## १०. मादाम बॉन्सिअ

डार्टा थोड्या वेळाने आपल्या खोलीकडे परत आला. मॉन्सिर बॉन्सिअ केव्हाच निघून गेला होता व त्याचे तीन शिलेदार मात्र त्याची वाट पाहात ताटकळत बसले होते. प्रत्येक रस्ता न् रस्ता आणि घर न् घर हुडकून डार्टा हात हलवीत परत आला होता. या तीन मित्रांना पाहून त्याला जरा विरंगुळा वाटला. नाही तर निराशेने व दगदगीने त्याला वेडच लागण्याची पाळी आली होती. त्याने आपल्या शत्रूच्या आगमनाची वार्ता आपल्या तीन मित्रांना निवेदन केली.

त्याचे भाषण संपते न संपते तोच मॉन्सिर बॉन्सिअ धडपडत घाबऱ्या घाबऱ्या आत आला व कळवळून म्हणाला, ''मला वाचवा हो वाचवा. चार लोक मला पकडण्यासाठी आले आहेत.''

पार्था व अरामी ताड्कन उठून उभे राहिले व त्यांनी आपल्या तरवारी उपसल्या; पण डार्टाने खूण करून त्यांना दाबले.

''आपण जरा दक्षता घेतली पाहिजे.'' तो पुटपुटला.

''होय,'' ऑथा हळूच म्हणाला, ''डार्टा, या प्रकरणाची सूत्रं तुम्हीच हलवा.''

इतक्यात चार शिपाई तेथपर्यंत येऊन धडकले. तीन शिलेदार व डार्टा तेथे आपल्या तरवारीवर हात ठेवून उभे असलेले दिसताच मात्र ते जरा बिचकले व उंबऱ्यात घोटाळू लागले.

''सभ्य लोकहो, आत या. ही माझी जागा आहे व मी आणि माझे हे तीन मित्र राजा व कार्डिनल यांचे प्रामाणिक सेवक आहोत. आपणांस अनमान वाटण्याचं कारण नाही.'' डार्टा त्यांना उद्देशून म्हणाला.

''मग तुम्ही आमच्या कार्यात अडथळा खचित करणार नाही.'' त्यांचा पुढारी पुढे येऊन म्हणाला.

''मुळीच नाही. उलट आम्ही तुम्हाला साहाय्यच करू.'' डार्टा उत्तरला.

''काय बडबडतो आहे हा प्राणी!'' डार्टाचा कावा काही न कळल्याने पार्था कुरबुरला.

''चूप बैस, बडबडू नको.'' ऑथा हळूच त्याच्यावर खेकसला.

''पण मला तुम्ही वचन....'' बॉन्सिअ भीतीने हळूच विव्हळला.

''चूप! आम्ही मोकळे राहण्यात तुझं हित आहे. तुझ्याशी आमचा निकट संबंध दिसताच आम्ही पकडले जाऊ आणि साराच घोटाळा होईल.'' डार्टाने त्याला दम दिला..

''पण....''

''सभ्य गृहस्थहो, आत या ना! मॉन्सिर बॉन्सिअ आज प्रथमच मला भेटला होता. त्याला त्याचं भाडं पाहिजे आहे, होय ना?''

''होऽय....पऽपऽण.....''

''चूप मूर्खा, नाही तर सर्वांचा घात करशील.'' डार्टा हळूच खेकसला. नंतर तो मोठ्याने म्हणाला, ''तुम्ही खुशाल या माणसाला पकडून तुरुंगाकडे नेऊ शकता. त्याला जितके दिवस डांबाल तितकं बरंच, म्हणजे माझं भाडं तरी जरा लांबणीवर पडेल. सारखा लकडा लावला आहे बेट्यानं!''

कार्डिनलच्या दूतांनी डार्टाचे आभार मानले व बॉन्सिअची उचलबांगडी केली.

फिरून तेथे चौघे मित्र उरताच पार्था म्हणाला, ''अरे, हे तू आरंभलं तरी काय आहेस? आम्ही तिघे शिलेदार इथं जिवंत असता आश्रयाला आलेल्या एका गरीब माणसाला त्यांनी आमच्या देखत खेचून न्यावं नि आम्ही स्वस्थ बसावं हा धडधडीत आपला उपमर्द नाही काय? अरामी, तुला काय वाटतं?''

''मलाही तेच म्हणायचं आहे.''अरामी उत्तरला.

''मी डार्टाला खरोखरीच शाबासकी देतो. त्यानं केलं तेच योग्य.'' ऑथा म्हणाला.

डार्टाने त्याची समजूत काढण्याचा फारसा प्रयत्न केला नाही. पण शेवटी तो अेवढेच म्हणाला, ''आता या क्षणापासून कार्डिनलचा आणि आपला लढा चालू झाला.''

बॉन्सिअला पकडल्या दिवसापासून त्याच्या घराचा उपयोग कार्डिनलचे लोक एखाद्या सापळ्याप्रमाणे करू लागले. त्याच्याकडे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला ते प्रथम ताब्यात घेत व योग्य ती माहिती घेतल्यावाचून त्याला सोडीतच नसत. आपल्या खोलीत बसून डार्टाला या साऱ्या हालचालींचा चांगलाच सुगावा घेता येअी. त्याच्या खोलीच्या नेमकी खालीच बॉन्सिअची बैठकीची जागा होती. तक्तपोशीच्या फळ्या किलकिल्या करून डार्टा खालील सर्व प्रकार पाही व ऐके. कार्डिनलच्या दूतांचा शब्दन् शब्द त्याच्या कानी येई.

एके दिवशी बॉन्सिअचा दरवाजा ठोकलेला त्याला ऐकू आला. लगेच थोडी धडपडही झाली व एका बाईचा रडका सूरही ऐकू आाला.

''मी तुम्हाला सर्व काही सांगते, मी ह्या घराची धनीण मादाम बॉन्सिअ आहे. मी राणीसाहेबांकडे नोकरीला असते.'' ती रडक्या आवाजात बोलत होती. त्या बाईचा अधिक छळवाद चालू झालेला पाहताच मात्र डार्टाचे पित्त भडकले, ''प्लाँशे?'' आपल्या नोकराला हाक मारून तो म्हणाला, ''माझी तरवार आण. आणि हे पाहा, ऑथा, पार्था व अरामी यांना म्हणावं मी तत्काळ बोलावलं आहे. जा पळ.''

''पण मालक, तुम्ही कुठं चालला आहात?''

''मी खाली तळमजल्यावर जातो आहे.लेकाच्यांचा मलाही सापळ्यात पकडण्याचा डाव दिसतो आहे.'' डार्टा गुरगुरला.

डार्टाने दार ठोठावताच दार उघडले गेले. पण तो आत जाताच मागोमाग लागलेच ते लावलेही गेले. थोड्याच वेळात आत आरडाओरडा, सामानाची उलथापालथ व तरवारींचा खणखणाट यांची एकच गर्दी उठली. अवघ्या दहा मिनिटांतच दरवाजा उघडून काळे झगे परिधान केलेल्या चार व्यक्ती जीव घेऊन बाहेर पळताना दिसून आल्या. डार्टाने कार्डिनलच्या दूतांचा चांगलाच काटा काढला होता, त्यांनी पलायन करताच त्याने दिवाणखान्यात इकडे तिकडे पाहिले. कोपऱ्यात एका कोचावर अर्धवट बेशुध्द स्थितीत बॉन्सिअ बाई पडली होती. तिचे सौंदर्य अप्रतिम होते. थोडी शुध्दीवर येताच डार्टाकडे पाहून तिने स्मित केले. डार्टाला आनंद झाला. इतके गोड हास्य त्याने यापूर्वी कधीच पाहिले नव्हते.

''माझ्यासाठी तुम्हाला फारच त्रास झाला. मी तुमची अत्यंत आभारी आहे.'' ती म्हणाली.

''आभार मानण्याची आवश्यकता नाही बाईसाहेब! कोणीही हेच केलं असतं.'' डार्टा उत्तरला.

''माझे पती कुठे आहेत? या माणसांनी मला का छळलं? त्यांना माझ्यापासून काय पाहिजे होतं?''

''हे लोक कार्डिनल रिशल्यूचे दूत आहेत.'' डार्टा म्हणाला, ''तुमच्या यजमानाना त्यांनी तुरुंगाचा रस्ता दाखविला आहे.''

''माझे पती तुरुंगात? त्यानी काय केलं आहे? त्यांच्याइतका निरुपद्रवी प्राणी जगात मिळायचा नाही!''

''ते आपले पती आहेत हाच त्यांचा अपराध! त्यासाठीच त्यांना अटक झाली आहे.''

''एकंदरीत तुम्हाला सर्व माहीत आहेसं दिसतं.''

''तुम्हाला गालावर वण असलेल्या उंचेल्या गृहस्थानं नेलं होतं ना?''

'' हो! होय! काय बरं त्या गृहस्थाचं नाव? कोण तो?'' बॉन्सिअ बाईने मोठ्या उत्सुकतेने विचारले.

''तेच तर मला माहीत नाही. बरं, तुम्ही इथं आता फार वेळ बोलत बसणं बरं नाही. हे लोक बहुधा अधिक

साहाय्य आणण्यासच गेलेले असतील. ते परत आले व आपण इथं सापडलो तर सर्वच अवतार संपला! मी माझ्या मित्रांना निरोप पाठविला आहे, पण बहुधा ते घरी नसतील. मी आपणांस आता कुठे नेऊन सोडू तेवढं सांगा.''

''आता मी तरी काय सांगू? माझ्या विश्वासाचं आता कुणीच नाही. मी त्यांना निरोप देऊन वाड्यात  ला पोर्ट यांच्याकडे पाठविणार होते, पण त्यांचाही पत्ता नाही. आता काय करावं हा मोठा प्रश्न आहे.'' बॉन्सिअबाई म्हणाली.

''माझ्यावर आपला विश्वास असेल तर पाहा, मी आपलं काम करू शकेन. मला आपला परवलीचा शब्द सांगा म्हणजे मी वाड्यात जाऊन  ला पोर्ट  यांची गाठ घेतो व आपला निरोप त्यांना कळवून अिकडे पाठवून देतो.''

''तुमच्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. वाड्यात जाऊन जर्मेनचा तपास करा  व त्याला 'टूर्स आणि ब्रुसेल्स' हा परवलीचा शब्द सांगा म्हणजे तो तुम्ही सांगाल त्याप्रमाणे सर्व व्यवस्था करून देईल.'' बॉन्साअबाई म्हणाली.

''मी त्याला काय सांगू?''

''ला पोर्टना पाठवून देण्यास सांगा.''

''नंतर?''

''ला पोर्टना मजकडे येण्यास सांगा. मी आता कुठे जावं हा मोठा प्रश्न आहे.''

''तुम्हाला मी ऑथाकडे नेऊन सोडतो. तो माझा स्नेही आहे. तो घरी नसला तरी आपण निःशंकपणे त्याच्या घराचा आश्रय करू शकता.''

''नंतर लवकर डार्टा राजवाड्यात गेला. बॉन्सिअबाअीने सांगितल्याप्रमाणे त्याने सर्व कार्यक्रम उरकला व लगेच  ला पोर्ट आपल्या मानलेल्या कन्येला भेटण्यासाठी वाड्यातून बाहेर पडला.

●●●

## ११. डार्टा आणि बकिंगहॅमचा ड्यूक

घरी परत येत असता डार्टाला अरामीची भेट घेण्याची लहर आली. प्लॉंशेला  आपण इतक्या घाईने का पाठविले होते याचा एकदा त्याच्यापाशी उलगडा करावा असे त्याला वाटले. अरामीच्या घरापाशी तो आला तेव्हा आपल्यापुढेच एक बाई चालली असल्याचे त्याच्या दृष्टीस पडले. तिने आपले सर्व अंग अेका काळ्या झग्याने आच्छादून घेतले होते व प्रत्येक घराचे दार ती निरखून पाहात होती. तिला हवे असलेले घर निश्चितपणे तिला माहीत नसावे असे तिच्या एकंदर वागण्यावरून दिसत होते. पुढे होऊन डार्टा तिला साहाय्य देण्यास उद्युक्त होणार तोच ती अरामीच्या घरापुढे उभी राहिली आणि तिने दारावर तीनदा टक् टक् असा आवाज केला.

''वाऽ ही तर अरामीला भेटायला आली आहे.'' डार्टा स्वतःशी  म्हणाला व पुढे काय होते ते पाहाण्यासाठी तेथेच दबा धरून बसला.

बाईच्या तीन टिचक्यांना उत्तर म्हणून आतून दोन टिचक्या दिलेल्या ऐकू आल्या. लगेच बाहेरील बाईने फिरून अेक टिचकी दिली. नंतर तिने आपल्याजवळील एक हातरुमाल बाहेर काढला व अर्धवट उघडलेल्या दाराच्या फटीतून त्या रुमालाच्या कोपऱ्यावरील नक्षी आतील व्यक्तीस दाखविली. डार्टा हळूच पुढे झाला. आत बहुधा अरामीच असावा अशी त्याची खात्री होती. सोवळ्या अरामीचे हे गुपित समजून घेण्यास तो फार उत्सुक झाला होता. अरामीचा चेहरा दिसेल म्हणून तो हळूच झाडाआडून किंचित पुढे झाला. पण आतून बोलणारी व्यक्तीही एक स्त्रीच आहे असे त्याला दिसून आले. थोड्याच वेळात फिरून दार बंद झाले. एव्हाना चांगलाच अंधार झाला असल्याने डार्टाला या दोन्ही स्त्रियांपैकी

कोणाचीच ओळख लागली नाही. दार बंद होताच बाहेरून बोलणारी स्त्री डार्टाच्या अगदी जवळून निघून गेली व त्यामुळे तो तिला ओळखू शकला. ती बॉन्सिअबाओी होती.

''या बाओीचं अरामीकडे काय काम असावं बरं?'' डार्टा विचार करू लागला. तो हळूच तिच्या पाठोपाठ निघाला. मागोमाग कोणाची तरी चाहूल बॉन्सिअबाईला ऐकू आली म्हणून तिने मागे वळून पाहिले. तेव्हा अंधारातून डार्टाची आकृती आपल्या पाठोपाठ येत असल्याचे तिला दिसले. त्यासरशी भीतीने अेक अस्फुट किंकाळी मारून तिने धूम पळण्यास आरंभ केला. डार्टानेही तिचा पाठलाग करून तत्काळ तिला गाठलेच. आपण कोण आहोत हे ओरडून डार्टाने तिला सांगताच ती थबकली. पण आश्चर्यमूढ होऊन ती डार्टाकडे टक लावून पाहू लागली.

''आऽ तुम्ही होय? मला वाटलं कुणी दुष्टानंच माझा पाठलाग केला.'' सुटकेचा अेक निःश्वास टाकून ती डार्टाला म्हणााली.

''मी बुद्ध्या तुमचा पाठलाग केला नाही. माझा मित्र अरामी याला भेटण्यासाठी म्हणून आलो तो तुम्ही काळ्या झग्यात त्याच्या दारावर टक्टक् करताना दिसलात. म्हटलं पाहावं काय प्रकार आहे तो. खरोखर अगदी सहजच सर्व गोष्टी घडून आल्या.''

''अरामी? कोण अरामी?''

''अरामी कोण? तुम्हास माहीत नाही काय अरामी कोण ते?'' डार्टा उद्गारला.

''मी उभ्या जन्मात कधी त्याचं नाव अैकलं नाही की त्याला पाहिलं पण नाही.'' बॉन्सिअबाईने ठासून उत्तर दिले.

''आज प्रथमच तुम्ही त्याच्या घरी गेला होता काय?'' डार्टाने विचारणा केली.

''होय.''

''त्या घरात अेक शिलेदार राहतो हे तुम्हास माहीत नाही?''

''नाही.''

''मग तुम्ही त्याला भेटण्यास आला नव्हता तर?'' डार्टाने चिकाटीने प्रश्न केला.

''खचित नाही. मी तिथं एका स्त्रीशी बोलत होते हे कदाचित तुम्ही पाहिलंही असेल. मग का उगीच मला छेडता?''

''होय, तेही खरंच. पण ती कोण होती?''

''ती एक गुप्त गोष्ट आहे, पण आता तुमची ही उलटतपासणी राहूद्या. मला एके ठिकाणी जायचं आहे, तिथं नेऊन आधी पोचवा पाहू मला.'' ती म्हणाली.

''कुठं जायचं आहे?''

''ते तुम्हाला माझ्याबरोबर आल्यावर कळेलच. पण मला आधी एक वचन द्या की, मला तिथं दारात सोडून निघून जाईन म्हणून. नाही तर मी आपली इथंच तुमचा निरोप घेते. मला तुमच्या साहाय्याची तशी आवश्यकता नाही.''

डार्टाची फारशी इच्छा नसताही तो तसे वचन देऊन चुकला. डार्टाला आता तिच्यामागून जाण्यावाचून गत्यंतरच नव्हते. अेक दोन गल्ल्या ओलांडून तिने बऱ्याच प्रयासाने आपल्याला हवे असलेले घर हुडकून काढले. दरवाज्यापाशी येताच तिने डार्टाला निरोप देण्याचा विचार केला. ''तुमच्या साहाय्याबद्दल मी आभारी आहे.'' लगेच पुढे ती चिंतायुक्त स्वरात म्हणाली, ''तुम्ही वचन दिल्याप्रमाणे आता माझी वाट बघत न बसता निघून जा हं.''

''तुमची इच्छा नाही तर मी कशाला थांबू? मी तत्काळ निघून जातो.'' डार्टाने तिला फिरून एकदा आश्वासन दिले.

घरी परत येत असता वाटेत त्याला ऑथाची आठवण झाली म्हणून त्याने तत्काळ तिकडे तोंड वळविले. तो आपल्या मित्राच्या घरात प्रवेश करणार तोच प्लाँशे त्याला सामोरा आला. धन्याला पाहताच त्याने अेक महत्वाची वार्ता त्याला सांगितली. ऑथाला पकडण्यात आले होते. तो डार्टाला भेटण्यासाठी त्याच्या खोलीकडे गेला असता कार्डिनलच्या दूतांनी त्याला डार्टा समजून पकडले होते.

''मग त्यानं आपलं खरं नाव का सांगितलं नाही?'' डार्टाने विचारले.

''त्यानी बुध्द्याच तसं केलं नाही. नंतर ते मला म्हणाले, ''मी खरा कोण आहे हे त्यांना समजण्यात दोन तीन दिवस जातील. तेवढ्या अवधीत डार्टाला आपली

योग्य ती सोय लावून घेता येअील. तोपर्यंत समजू देत खुशाल आपण डार्टाला पकडलं आहे म्हणून.''

''धन्य आहे त्या शूर ऑथाची!'' डार्टा प्रेमाने उद्गारला, ''बरं झालं. आता मला मॉन्सिर त्रिवेल यांची गाठ घेऊन सर्व वृत्तांत निवेदन करता येईल. मग ते काय ते पाहून घेतील.''

डार्टाने त्रिवेलच्या घराकडे धाव घेतली. पण त्रिवेल केव्हाच राजवाड्याकडे गेला होता. डार्टानेही तिकडेच जाण्याचा बेत केला. सडकेने जात असता काळ्या झुब्ब्यात गुरफटून घेतलेली बॉन्सिअबाई व तिच्यासह शिलेदाराच्या पोशाखात असलेला अरामी अशी जोडी समोरच त्याला दिसली. आता मात्र त्याच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. बॉन्सिअबाईने तोंडावर बुरखा ओढून घेतला होता व अरामीने एका हातरुमालाने आपला चेहरा झाकला होता. गुप्तपणाने वावरण्याची त्यांची इच्छा त्यावरून स्पष्ट दिसत होती. अरामीसंबंधी अज्ञान दाखवून फिरून त्याच्याबरोबरच भटकणाऱ्या बॉन्सिअबाईला ह्या वेशात व स्थितीत पाहून त्याला चांगलाच राग आला. त्यामुळे चिडून जाऊन त्याने प्रथम त्या रहस्याचा भेद करण्याचा निश्चय केला. झपझप् पावले टाकीत तो प्रथम त्या दुकलीला ओलांडून पुढे गेला व नंतर अेकदम परत वळून त्यांच्यासमोर अुभा राहिला. तेव्हा त्या शिलेदाराने किंचित अेक पाअूल मागे सरून विचारले, ''भल्या गृहस्था, तुला काय पाहिजे?'' त्याचा आवाज व शब्दोच्चार करण्याची अपरिचित पध्दत पाहून डार्टा दचकला.

''तुम्ही अरामी नव्हे तर?'' त्याने आश्चर्याने विचारले.

''नाही, मी अरामी नाही. तुमची काही तरी चूक झालेली दिसते. तुमच्या चुकीकरिता मी तुम्हाला क्षमा केली आहे. आमच्याशी तुम्हाला काही कर्तव्य दिसत नाही. तर सोडा आमचा मार्ग. जाऊद्या आम्हाला.''

''खरं आहे महाराज. मला आपल्याशी काहीच कर्तव्य नाही. पण ह्या बाईंशी माझं थोडं काम आहे.''

''महाराज, तुम्ही मला वचन दिलं आहे आणि एखाद्या सभ्य गृहस्थाप्रमाणं किंवा शिपायाप्रमाणं आपण ते पाळलं पाहिजे.'' धिक्कारयुक्त स्वरात बॉन्सिअबाई म्हणाली.

''आणि बाअीसाहेब, तुम्हीही पण -'' डार्टाचे वाक्य पुरे होण्यापूर्वीच ती तिऱ्हाईत व्यक्ती म्हणाली, ''बाईसाहेब, धरा माझा हात.'' डार्टाला ढकलून त्याने पुढे पाअूल टाकले. डार्टा तत्काळ त्याला आडवा झाला व क्षणातच दोघांच्याही तरवारी बाहेर पडल्या. बॉन्सिअबाअी दोघांनाही आडवी झाली व अत्यंत काकुळतीच्या स्वरात म्हणाली, ''ड्यूकसाहेब... बकिंगहॅमचे ड्यूक....''

''बकिंगहॅमचे ड्यूक!'' मंत्रमुग्ध होऊन डार्टा पुटपुटला व त्याने आपली तरवार म्यान केली.

●●●

## १२. रत्नहार

पॅरिसला आपल्याला लबाडीने आणण्यात आले आहे. व जोपर्यंत आपण फ्रान्समध्ये आहोत तोपर्यंत आपले जीवित सुरक्षित नाही हे बकिंगहॅम पूर्णपणे ओळखून होता. पण राणीविषयीचे त्याचे प्रेम व त्याचे धाडस या दोन्ही गोष्टी असामान्य असल्याने राणीसाहेबांची गाठ घेतल्यावाचून परत इंग्लंडला जाण्यास तो राजी नव्हता. त्याच्या सुरक्षिततेविषयी राणीला फार काळजी वाटत होती. त्याचप्रमाणे आपली गाठ घेतल्यावाचून फ्रान्स सोडण्यास तो संमत होणार नाही हेही ती जाणून होती व म्हणूनच तिने त्याला चोरून राजवाड्यात आणण्याची कामगिरी बॉन्सिअबाईकडे सोपविली होती. कार्डिनलला या बेताचा साधारण सुगावा लागला असल्याने बॉन्सिअबाईला ताब्यात घेण्याचा त्याने प्रयत्न करून पाहिला. पण डार्टाच्या कर्तृत्वामुळे तो यशस्वी होऊ शकला नाही. आणि शेवटी तिने बकिंगहॅमला वाड्यात नेलेच व वाटेतच ती डार्टाला भेटली. कार्डिनलला हात

चोळीत बसण्यावाचून गत्यंतर राहिले नाही.

एकांतात राणीने बकिंगहॅमला तत्काळ फ्रान्स सोडण्याची कळकळीने विनंती केली, नाही तर जीविताला धोका पोहोचेल अशी सूचना देण्यासही तिने कमी केले नाही. बकिंगहॅमसारखा धाडसी मनुष्य सहजासहजी निघून जाणे शक्यच नव्हते, पण त्याच्या राहण्यामुळे आपल्यालासुध्दा धोका येईल असे राणीने सांगताच मात्र तो फ्रान्स सोडावयास तयार झाला व त्याने परत इंग्लंडला जाण्याचे ठरविले.

''पण तुमची खूण म्हणून तुम्ही मला काही तरी दिलंच पाहिजे. अंगठी द्या, साखळी द्या, पण तुम्ही वापरीत असलेली एखादी का होईना, पण वस्तू माझ्याजवळ आठवण म्हणून अवश्य पाहिजे.'' बकिंगहॅम म्हणाला.

''तशी एखादी वस्तू देताच तुम्ही परत जाल इंग्लंडला?'' राणीने विचारले.

''होय.''

''अगदी तत्काळ?''

''जरूर.''

राणी तत्काळ तिथून निघून गेली व थोड्या वेळात अेक चिमुकली नाजूक पेटी घेऊन परत आली. त्याने त्या पेटीचा स्वीकार केला व राणीचे आभार मानून बॉन्सिअबाईसह गुप्तमार्गाने राजवाडा सोडला.

मध्यंतरी तुरुंगात मॉन्सिर बॉन्सिअला कार्डिनलच्या दूतांनी चक्रावर धरले होते. त्याच्या बायकोविषयी व डार्टाविषयी प्रश्न विचारून त्यांनी त्याला अगदी त्रासून सोडले होते. तो भित्रा मनुष्य कोणीकडून तरी उत्तरे देऊन प्रश्न विचारणाऱ्यांना संतुष्ट करण्याचा प्रयत्न करीत होता. आपल्या पत्नीने डार्टाच्या साहाय्याने ह्या लोकांच्या हातांवर तुरी दिल्याची वार्ता ऐकून मात्र त्याला चांगलाच अचंबा वाटला.

''मॉन्सिर बॉन्सिअ, तुम्ही डार्टाची भेट घेऊन आपल्या बायकोची सुटका करून देण्यासंबंधी त्याच्याशी काही करार केला होता काय?'' त्याला तुरुंगाधिकारी विचारत होता. तो पुढे म्हणाला, ''काही अडचण नाही. आम्ही डार्टालाही पकडलं आहे. भेटवूच त्याला आम्ही इथं तुम्हाला.''

''त्यांना पाहून मला आनंद होईल. एखादा तरी ओळखीचा चेहरा इथे पाहायला मिळाल्यासारखं होईल.'' बॉन्सिअ उत्तरला.

''डार्टाला आत आणा पाहू!'' तुरुंगाधिकारी ओरडला.दोन पहारेवाल्यांनी ऑथाला तत्काळ आत आणून अुभा केला.

''मॉन्सिर डार्टा, काल तुम्ही व मॉन्सिर बॉन्सिअ ह्यांच्यामध्ये काय काय ठरलं ते सांगा पाहू!'' तुरुंगाधिकारी म्हणाला.

''पणऽ पण हे मॉन्सिर डार्टा कुठं आहेत?'' मॉन्सिअ अडखळत पुटपुटला. डार्टा म्हणून ऑथाला हे लोक का संबोधतात हेच त्याला कळेना.

''काय? हे गृहस्थ मॉन्सिर डार्टा नव्हेत?''

''नाहीत, मुळीच नाहीत!''

''मग या माणसाचं नाव काय?''

''मला काय माहीत? माझ्या ओळखीचे ते थोडेच आहेत!'' बॉन्सिअ अुद्गारला.

''यांची व आपली ओळखच नाही. भले महाराज! मग आपलं नाव काय हो?'' तुरुंगाधिकाऱ्याने ऑथाकडे वळून विचारले.

''ऑथा!'' ऑथा उत्तरला.

''मग तुम्ही आपलं नाव डार्टा म्हणून का सांगितलं?''

''नाही महाराज, मला पकडणारे लोक मला डार्टा म्हणू लागले. मी त्यांना म्हटलं तुम्हाला पाहिजे तर म्हणा तसं. माझं काय जातं? मी सांगून त्यांनी ऐकलं पाहिजे ना? मला ते डार्टाच म्हणत आहेत. त्यांच्या कल्पनेप्रमाणं मी खोटं बोलत आहे. आता मी तरी काय करू?''

''मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो महाराज की हे डार्टा नाहीत.'' मध्येच बॉन्सिअ ओरडला व पुढे म्हणाला, ''तो एकोणीस वीस वर्षांचा तरुण आहे. हे गृहस्थ तर तिशीच्या घरात दिसतात. डार्टा डेसार्टच्या शरीरसंरक्षकांच्या पथकात आहेत; आणि यांच्या अंगावर तर शिलेदाराचा वेश दिसतो. माझे भाडेकरूच ते असल्याने मी त्यांना पूर्ण ओळखतो.''

''खरं आहे! खरं आहे!'' घोटाळ्यात पडलेला तुरुंगाधिकारी पुटपुटला. इतक्यात अेका पहारेवाल्याने

त्याला एक चिठी आणून दिली. ती चिठी वाचून तर तो अधिकच बुचकळ्यात पडलेला दिसला.

''तुमची पत्नी मोठी कारस्थानी स्त्री दिसते. तुम्हाला तिनं चांगलंच पेचात आणलं आहे.'' बॉन्सिअला उद्देशून तो म्हणाला.

''महाराज, मला तिच्या या भानगडीचा काहीच पत्ता नाही. तिनं खराच काही अपराध केला असल्यास मला तिच्याशी यापुढं काहीच कर्तव्य नाही. मी आपला गरीब सामान्य मनुष्य.'' तो काकुळतीनं म्हणाला.

''सूऽऽ हे पाहा, माझं इथं काही कारण नसलं तर मला आपलं दुसरीकडे कुठं तरी पाठवून द्या कसे. तुम्ही आणि ते बॉन्सिअ काय ते पाहून घ्या. मला या प्रकरणाशी काहीच कर्तव्य नाही.'' ॲथाने मध्येच गाऱ्हाणे मांडले.

''या बंद्यांना नेऊन कोंबा त्यांच्या त्यांच्या कोठड्यांत'' तुरुंगाधिकारी पहारेकऱ्यांवर खेकसला.

सायंकाळी फिरून एक दुय्यम अधिकारी मॉन्सिर बॉन्सिअच्या कोठडीत आला. त्याला पाहताच फिरून बॉन्सिअला भीतीने कापरे भरले. आपल्यापुढे आणखी नवीन काय वाढून ठेवले आहे याची त्याला कल्पना करता येईना.

कोठडीचा दरवाजा सताड उघडून त्या अधिकाऱ्याने बॉन्सिअला आपल्या मागून येण्याची आज्ञा केली. ती ऐकून बॉन्सिअने विचारले, ''आता फिरून मला कुठं नेणार तुम्ही?''

''ती पंचाईत करण्याचं तुम्हाला कारण नाही,'' एवढेच तुटक उत्तर त्याला मिळाले. तुरुंगाबाहेर त्याला एका घोड्याच्या गाडीत बसविण्यात आले. गाडीभोवती पहारेकऱ्यांचा सज्ज पहारा होता. थोड्याच वेळात पॅरिसच्या रस्त्यांतून गाडी भरधाव निघाली.

आपल्याला बहुधा हे लोक आता जिवंत सोडीत नाहीत अशी बॉन्सिअची खात्री झाली. तो भीतीने केव्हाच बेशुध्द होऊन गाडीत पडला. थोड्या वेळाने मृतप्राय स्थितीतच त्याला एका भव्य दिवाणखान्यात नेण्यात आले. त्या दिवाणखान्यात असंख्य कपाटे असून ती पुस्तकांनी गच्च भरलेली होती. दिवाणखान्याच्या कडेला असलेल्या शेगडीपाशी एक मध्यम उंचीचा गृहस्थ उभा असून त्याने आपली क्रुध्द व भेदक दृष्टी बॉन्सिअकडे लावली. हा कार्डिनल रिचल्यू होता. तो एखाद्या पाद्र्याप्रमाणे न दिसता सैनिकाप्रमाणे दिसे. थोडा वेळ तो आपल्या हातातील कागद बारकाईने पाहात होता व नंतर त्याने आपली कठोर दृष्टी बॉन्सिअकडे वळवली.

''तुमचंच नाव मॉन्सिर बॉन्सिअ काय?'' कार्डिनलने विचारले.

''होय महाराज.'' बॉन्सिअ उत्तरला.

''मादाम शेव्हरूज... आपली पत्नी व बकिंगहॅमचा ड्यूक ह्यांच्याशी संगनमत करून तुम्ही देशद्रोह केला आहे असा तुमच्यावर आरोप आहे.''

''महाराज, पण मला यांतील काहीच माहिती नाही. माझ्या पत्नीच्या तोंडून क्वचित ही नावं मी ऐकली आहेत एवढंच....''

''ती काय म्हणत असे?''

''ती म्हणत असे, कार्डिनल रिचल्यूनं राणीचा व बकिंगहॅमच्या ड्यूकचा नाश करण्यासाठी ड्यूकला पॅरिसला मोठ्या कौशल्यानं आणलं आहे.''

''अस्सं काय!'' कार्डिनल क्रोधाने गरजला.

''होय.'' आपण कार्डिनलशी बोलत आहोत याची काहीच कल्पना नसलेला बॉन्सिअ म्हणाला, ''पण मी तिला लगेच सांगितलं की, अशी कारस्थानं करण्याइतपत बुध्दिमत्ता.....''

''चूप बैस मूर्खा!'' कार्डिनल खेकसला.

''अगदी माझी बायको अस्संच म्हणाली.''

''तुझ्या बायकोला कुणी नेलं तुला माहीत आहे का?''

''नाही महाराज, पण मला एका गृहस्थाची मात्र शंका आहे.'' कार्डिनलने घंटानाद केला व तत्काळ एक अधिकारी आत आला. त्याला उद्देशून तो म्हणाला, ''जा, तत्काळ रोशफोरला पाठवून दे.''

''होय महाराज,'' लवून प्रणाम करून तो अधिकारी उत्तरला.

''अरेच्या! हा कार्डिनल तर नाही ना?'' बॉन्सिअ स्वतःशी पुटपुटला. थोड्याच वेळात दार उघडून एक मनुष्य आत आला. त्याला पाहाताच बॉन्सिअ भान न राहून एकदम ओरडला, ''हाच तो! हाच तो!!''

''हाकला या मूर्खाला इथून आणि मी परत बोलवीपर्यंत ठेवा कुठंतरी पहाऱ्यात.'' कार्डिनल ओरडला. तत्काळ बॉन्सिअला तेथून हलविण्यात आले. नंतर आत आलेला तो उंच व गालावर वण असलेला मनुष्य कार्डिनलपाशी येऊन उभा राहिला आणि मोठ्या उत्सुकतेने म्हणाला, ''त्यांनी एकमेकांची गाठ घेतली.''

''कुणी?'' कार्डिनलने विचारले.

''राणीसाहेब आणि बकिंगहॅमचे ड्यूक.''

''कुठं?''

''प्रत्यक्ष राजवाड्यातच.''

''तुला ही वार्ता कुणी सांगितली?''

''लॅनायबाईनं. आपली ती एकनिष्ठ सेविका आहे. ती म्हणाली, 'रात्री साडेबारापर्यंत राणीसाहेब आपल्या महालात होत्या. नंतर त्यांना कुणीतरी एक हातरुमाल आणून दिला. तो पाहून राणीसाहेबांची जरा तारांबळच उडाली व त्या भेदरलेल्या आवाजात म्हणाल्या, 'जरा थांबा हं, मी दहा मिनिटांत जाऊन येते.' परंतु पुढं जवळजवळ पाऊण तास त्या परत आल्या नाहीत. त्या परत आल्या व लगेच एक नाजूक चंदनी पेटी घेऊन बाहेर गेल्या. फिरून आल्या त्या वेळी मात्र त्यांच्या हाती ती पेटी नव्हती.''

''लेनॉयबाईला त्या पेटीत काय होतं हे माहीत आहे का?'' कार्डिनलने विचारले.

''हो, राणीसाहेबांना राजेसाहेबांनी प्रेमाने दिलेला रत्नहार तिच्यात होता!''

''आणि तो राणीसाहेबानी बकिंगहॅमच्या ड्यूकला दिला?''

''होय.''

''बकिंगहॅमच्या ड्यूकला पकडण्यासाठी तत्काळ शिपाई पाठवा!''

''आता फार उशीर झाला. तो केव्हाच गेला आहे.''

''मग मी देतो ते पत्र तत्काळ इंग्लंडमध्ये पोचविण्याची व्यवस्था करा.'' असे म्हणून कार्डिनल पत्र लिहिण्यास बसला.त्याने लिहिले - ''मिलडी, बकिंगहॅमचा ड्यूक ज्या नाचाला प्रथम उपस्थित राहील तेथे जा. त्याने त्यावेळी रत्नजडित बारा पदकांचा हार गळ्यात घातलेला असेल. त्यापैकी दोन पदके काय वाटेल ते करून संपादन कर व ती हाती येताच तत्काळ कळव.''

●●●

## १३. फ्रान्सची राणी

कार्डिनलचे पत्र गेल्यानंतर सुमारे आठ पंधरा दिवसांनी इंग्लंडहून त्याचे उत्तर आले. त्यात लिहिले होते - ''मी पदके मिळविली आहेत. पण पैशांच्या अभावी मला लंडन सोडणे शक्य नाही. मला पाचशे पौंड पाठवून द्या. पैसे पोचल्यानंतर चार-पाच दिवसांतच मी पॅरिसला उपस्थित होत आहे.''

''फार उत्तम! कार्डिनलशी वैर पत्करल्याबद्दल राणीला पश्चात्ताप करण्याचा दिवस आता निःसंशय लवकरच उजाडणार.'' कार्डिनल हर्षाने म्हणाला. तो एकदम राजाकडे गेला व म्हणाला, ''महाराज, राणीसाहेबांना नृत्य किती प्रिय आहे हे आपणांस माहीत आहेच. त्यांना आनंदित करण्यासाठी आपण एखादा नृत्याचा कार्यक्रम घडवून आणल्यास फारच उत्तम!''

''नृत्य! मला तर नृत्य अगदीच अप्रिय आहे.'' राजा म्हणाला.

''वाऽ मग तर राणीसाहेबांना अधिकच आनंद होईल. त्यांच्या सन्मानार्थ तुम्ही नृत्याचा कार्यक्रम घडवून आणण्यानं त्या अगदी सुप्रसन्नच होतील. तुम्ही त्यांना वाढदिवसानिमित्त भेट म्हणूनच दिलेला रत्नहारही या निमित्तानं गळ्यात घालण्यास सांगा!''

''काही अडचण नाही म्हणा, पण कार्यक्रम कोणत्या दिवशी ठेवावा बरं?'' कार्डिनलने मनातल्या मनात गणित

करून पाहिले. ''आज सेप्टेंबरचा वीस दिनांक आहे. पैसे इंग्लंडला पाठविण्यास चार-पाच दिवस लागतील. पदकं इकडे येण्यास चार पाच दिवस, दोन तीन दिवस फार तर इकडे तिकडे. म्हणजे ऑक्टोबर तीन हा दिवस ठरविण्यास काहीच आडकाठी नाही.'' असे मनात ठरविल्यानंतर तो मोठ्याने म्हणाला, ''तीन ऑक्टोबरला कार्यक्रम ठेवण्यास मला मुळीच अडचण दिसत नाही. आधी एक दिवस वाटल्यास राणीसाहेबांच्या गळ्यात रत्नहार कसा काय दिसतो ते पाहाण्यास हरकत नाही.'' कार्डिनलने दोनदा रत्नहाराचा केलेला उल्लेख राजाच्या ध्यानात आल्यावाचून राहिला नाही. तो मनाशीच म्हणाला, ''कार्डिनल फिरून फिरून रत्नहाराची गोष्ट काढतो आहे यात काहीतरी गोम दिसते आहे. राणीला जाऊन आताच त्याविषयी सूचना करून ठेवावी हे बरं. म्हणजे आयत्या वेळी गडबडीत विसरायला नको.''

राजाकडून राणीला नृत्याची वार्ता कळताच तिला मोठा आनंद झाला. पण त्या दिवशी रत्नहार घालून येण्याची राजाची इच्छा ऐकताच मात्र ती पांढरीफट्ट पडली. तिला चांगलाच धक्का बसला. ''पण नाच आहे तरी केव्हा?'' ती हळूच पुटपुटली. कार्डिनलचा काहीतरी डाव या भानगडीच्या बुडाशी असावा अशी दाट शंका आता राजास आल्याने त्याने राणीस नक्की असा दिवस कोणताच सांगितला नाही. नुसते तो एवढेच म्हणाला, ''आहे, लवकरच आहे. पण कार्डिनलला विचारूनच नक्की काय ते सांगतो.''

राणीने कार्डिनलच्या मनातील दुष्ट हेतू तत्काळ ओळखला. राजाच्या मनात आपल्यासंबंधी विकल्प निर्माण करण्याचा डाव कार्डिनलने अप्रतिम टाकला आहे याची तिला कल्पना आली. तरी पण ती म्हणाली, ''काही अडचण नाही. नृत्याला येत आहे.''

''आपण त्या दिवशी रत्नहार मात्र अवश्य घाला हं.'' राजा फिरून म्हणाला.

''काही अडचण नाही.'' खचलेल्या अंतःकरणाने राणी म्हणाली.

राजा बाहेर पडताच कोचावर धाडकन् अंग टाकून ती मुळूमुळू रडू लागली. आता काय करावे हा तिच्यापुढे मोठाच प्रश्न होता. ड्यूक इंग्लंडला केव्हाच परत गेला होता. इंग्लंडला जाऊन त्याच्याकडून तो रत्नहार परत आणण्याचे काम व्यवस्थितपणे पार पाडणारा विश्वासू मनुष्य राणीपाशी नव्हता. आपल्याच सेवेतील कोणातरी स्त्रीने आपले गुपित कार्डिनलच्या कानावर घातले असले पाहिजे हे राणी ओळखून चुकली होती. पण ती स्त्री कोण असावी हे हुडकून काढणे अर्थातच कठीण होते. तसेच आता पुढे काय करावे हा प्रश्न होता ते निराळेच.

''राणीसाहेबांना माझी काही मदत होण्यासारखी आहे का?''

राणीने प्रश्न विचारणाऱ्या व्यक्तीकडे वळून पाहिले. ती बॉन्सिअबाई होती. ''तू? मी तुझ्यावर विश्वास ठेवू काय?''

''बेशक! राणीसाहेबांसाठी मी काय बरं करणार नाही?'' तिचे शब्द ऐकून व मुद्रा पाहून राणीला तिच्याविषयी गैरविश्वास धरवेना. बॉन्सिअबाई पुढे म्हणाली, ''राणीसरकारनी बकिंगहॅमच्या ड्यूकना दिलेला रत्नहार परत मिळवला पाहिजे असंच ना?''

''तू सर्व ऐकलंस तर!'' राणी हुंदके देत पुढे म्हणाली, ''रत्नहार परत तर मिळवलाच पाहिजे, पण हे होणार कसं?''

''ड्यूकसाहेबांकडे कुणाला तरी पाठवलं पाहिजे.''

''होय, पण एवढा मनुष्य आपणापाशी कोण आहे?''

''माझ्यावर विश्वास असेल तर असा विश्वासू मनुष्य मी राणीसाहेबांना मिळवून देऊ शकेन. त्याच्यापाशी एक पत्र द्यावं. तो काम अगदी नेमकं करील.''

''पण तेच पत्र शत्रूच्या हाती लागल्यास सर्वनाशच होईल.''

''ही गोष्ट होणार नाही. राणीसाहेबांनी माझ्यावर विश्वास ठेवावा. मी ते पत्र अशाच माणसाच्या हाती देईन की, ते तुमचं आहे याची त्याला कल्पनाही येणार नाही आणि तो ते बिनचूक इंग्लंडला नेऊन पोचतं करील.''

बॉन्सिअबाईचा हात राणीने मोठ्या प्रेमाने दाबला.

''तू एवढं काम केलंस तर माझे प्राण व मान वाचवायचं श्रेय तुला मिळेल.'' ती मोठ्या कृतज्ञतेने म्हणाली. नंतर राणीने पत्र लिहून स्वतःच्या मोहरेने ते मोहरबंद करून

बॉन्सिअबाईच्या हाती दिले. ''तुला पैसेही लागतील नाही? ही माझ्या भावानं दिलेली मौल्यवान अंगठी घे व ती विकून येतील ते पैसे पत्र घेऊन जाणाऱ्या गृहस्थाला दे.'' राणी म्हणाली. राणीने दिलेले पत्र व अंगठी घेऊन बॉन्सिअबाई तत्काळ घरी आली. तिच्या नवऱ्याची तुरुंगातून नुकतीच मुक्तता झाली होती. राजवाड्यातून आज तिलाही आकस्मिक मोकळीक मिळाल्यामुळे तिला सहजच आज नवऱ्याचीही गाठ घेता आली. थोडा वेळ इकडल्या-तिकडल्या गोष्टी झाल्यानंतर बॉन्सिअबाईला एक गोष्ट कळून आली की, आपला पती कार्डिनलचा एकनिष्ठ भक्त झाला आहे. थोड्या फार धमकीने व लाचलुचपतीने मॉन्सिर बॉन्सिअला कार्डिनलने पूर्ण बनवून टाकले होते. रिचल्यूच्या विरुध्द एक शब्दही उच्चारण्याची त्याची आता छाती नव्हती. आपल्या बायकोची कोणतीही गुप्त गोष्ट कार्डिनलच्या कानावर घालण्याची त्याची आता तयारी झाली होती. इंग्लंडला जाण्यासाठी एखादा माणूस हुडकण्याच्या नादात आपली बायको आहे एवढा सुगावा त्याला लागला मात्र, त्याने तत्काळ कार्डिनलकडे धाव घेतली व ती वार्ता कळवली.

बॉन्सिअबाईला आपली चूक कळून आली. आपला पतीच आपला घात करायला सज्ज झालेला पाहून तिला रडू कोसळले. राणी आपणालाही इतरांप्रमाणे अप्रामाणिक समजणार याचे तर तिला अत्यंत दुःख झाले. डार्टा वर तक्तपोशीला कान लावून हा सर्व संवाद ऐकत होता व सर्व पाहात होता. तो तत्काळ खाली आला व बॉन्सिअबाईला म्हणाला, ''बाई, तुम्ही मुळीच चिंता करू नका. तुमच्या कामाची मला पूर्ण कल्पना आली आहे. मी तुमचा मित्र आहे. मी स्वतः लंडनला जाऊन आपलं काम उरकून येतो.''

●●●

## १४. प्रवास

बॉन्सिअबाईच्या घरातून बाहेर पडताच डार्टा प्रथम मॉन्सिर द त्रिवेलच्या घराकडे आला. त्याने स्वीकारलेल्या कामगिरीसाठी त्याला पंधराअेक दिवसांची सुटी घेणे प्राप्त होते. त्रिवेलच्या द्वारे डेसार्टला सांगून सुटी मिळवून पॅरिस सोडणे हेच सर्व दृष्टींनी श्रेयस्कर होते. सुटी मागताना कदाचित आपल्याला कारण सांगावे लागेल असे डार्टाला वाटले होते. पण डार्टा राणीच्या काही गुप्त कामासाठी जात आहे असे समजल्यानंतर त्रिवेलने अधिक खोलात शिरण्याचा मुळीच प्रयत्न केला नाही. उलट त्याने मोठ्या अगत्याने डार्टाच्या सुटीची व्यवस्था करून दिली.

''तू एकटाच जात आहेस काय?'' त्रिवेलने विचारले.

''होय महाराज.'' डार्टा म्हणाला.

''मग तुला लंडनला पोचण्याची आशाच नको. जहाजात चढण्यापूर्वीच बहुधा तुझा मुडदा पाडण्याची व्यवस्था केल्यावाचून कार्डिनल राहाणार नाही. या कामासाठी चार माणसं तरी अवश्य पाहिजेत, म्हणजे एखादा तरी अिष्ट स्थळापर्यंत जिवंत पोचायचा!'' त्रिवेलने तत्काळ डार्टाच्या सुटीबरोबरच ऑथा, पार्था व अरामी यांच्याही सुटीची व्यवस्था आपणहून केली. चौघांनी मिळून हे काम करावे याच बुध्दीने त्याने ही सोय केली व डार्टाच्या ती चांगलीच पथ्यावर पडली. त्रिवेलने आपल्या तीन शिलेदारांना तशा अर्थाची पत्रे पाठवून कळविले, तेव्हा न मागता मिळालेली सुटी पाहून ते तीनही मित्र मोठ्या आश्चर्यात पडले होते.

''माझी प्रकृती सुधारण्याकरिता थारेपालट करायला म्हणून मला सुटी देण्यात आली आहे असं त्रिवेलच्या पत्रावरून दिसतं.'' ऑथा पार्थाला म्हणाला, ''आणि तुला माझ्याबरोबर यायला मिळावं म्हणून दिली असेल.''

''मित्रहो, तसं काही नाही. आपणा सर्वांना लंडनला जायचं आहे.'' डार्टा शांतपणे म्हणाला.

''लंडनला? आणि तिथे जाऊन आम्ही काय करणार?'' अरामी ओरडला.

''ते मात्र मी तुम्हाला सांगू शकत नाही.'' डार्टा म्हणाला.

''हे राजेसाहेब किंवा राणीसाहेब यांचं काम आहे ना? बस्स, मग मी तुझ्यापाठोपाठ येण्यास तयार आहे.'' ऑथा म्हणाला.

ते चारही मित्र पहाटे दोनच्या सुमारास आपल्या नोकरांसह प्रवासास निघाले. सकाळी आठच्या सुमारास त्यांनी 'शांटली'पर्यंत ठेप मारली. आता त्यांना चांगलीच भूक लागली असल्याने न्याहरीसाठी म्हणून त्यानी एका पथिकाश्रमाचा आश्रय केला. पथिकाश्रमात गिऱ्हाइकांची दाटी अशी मुळीच नव्हती. केवळ एकच माणूस न्याहरी करीत बसला होता. हवापाण्यासंबंधी गप्पा मारीत साऱ्यांचे खाणेपिणे मजेत झाले. इतक्यात या चौघा मित्रांना घोडे सज्ज झाल्याची सूचना नोकराने दिली. ते आपापल्या जागा सोडून उठणार तोच तेथील तिऱ्हाईत प्रवाशाने पार्थाला कार्डिनलचे शुभ चिंतून आपल्यासह मद्याचा एक चषक घेण्याची विनंती केली.

''काही वांधा नाही, पण मग तुम्हीसुध्दा माझ्यासह राजाचे शुभ चिंतून एक चषक घेतला पाहिजे'' पार्था म्हणाला. वस्तुतः ही विनंती अगदीच सामान्य होती. पण तीमुळे तो गृहस्थ एकदम खवळला व कार्डिनलव्यतिरिक्त आपण कोणाचीच सत्ता जुमानीत नसल्याचे आरडून ओरडून सांगू लागला. हे भांडण पेटवून कालापव्यय करणे शिलेदारांना सोयीचे नसल्याने त्यांनी काढता पाय घेण्याचे ठरविले. पण तो मनुष्य कसला खट ! त्याने तलवार काढून पार्थाला द्वंद्वाचे आव्हान दिलेच.

''मूर्खा, नको होतं तेच नेमकं केलंस, आता माघार घेऊ नकोस. आम्ही पुढं होतो. तुझ्या द्वंद्वाचा निकाल लावून ये व आम्हाला गाठ.'' ऑथा हळूच म्हणाला व पार्थाला आणि त्याच्या नोकराला मागे ठेवून तिघा मित्रांनी आपला प्रवास पुढे चालू केला.

बरेच अंतर चालल्यानंतर एके ठिकाणी सडक दुरुस्त करण्याचे काम चालू असल्याचे त्यांना दिसले. दुरुस्त म्हणण्यापेक्षा नादुरुस्त म्हणणेच अधिक श्रेयस्कर. कारण कामकरी लोक सडकेत खड्डे काढून चिखलाने भरीत होते. ही काय दुरुस्ती म्हणायची? अरामीचे कपडे माती उडून चांगलेच राड झाले. त्याच्यासारख्या टापटिपीच्या मनुष्याला हे सहन होणार थोडेच! त्याने कामकऱ्यांना जरा दमदाटी केली. ऑथाने त्याला आवरण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, ह्यातून काही तंटा निर्माण होऊ नये म्हणून त्याने पराकाष्ठा केली, पण आता उपयोग होण्याजोगा नव्हता. ते कामकरी जणू निमित्ताचीच वाट पाहात होते! त्यांनी या प्रवाशांची पुरेपूर कुचेष्टा तर केलीच, पण एकाने त्यांच्यावर बंदूकही झाडली. अरामीला गोळी ओझरती लागून जखम झाली, पण आता थांबण्यात अर्थ नव्हता. डार्टाने निकड लावून सर्वांना घोडे दामटण्यास सांगितले. वेळ अगदी थोडा होता. वाटेत एक खेडे लागले तेथे अरामीला ठेवण्यावाचून गत्यंतरच नव्हते. त्याला चांगलाच अशक्तपणा आला होता. अरामीला व त्याच्या नोकराला तेथेच ठेवून बाकीच्यांनी प्रवास पुढे चालू केला. फार जलद प्रवास करून मध्यरात्रीच्या सुमारास त्यांनी 'अमीन्स ' गाठले.

ते ज्या पथिकाश्रमात आले त्याचा धनी फारच नम्र व अगत्यशील माणूस दिसला. पथिकाश्रमाच्या दोन कोपऱ्यांतील दोन सुंदर व आरामशीर स्वतंत्र खोल्या या दोन मित्रांना देण्याचे त्याने मान्य केले. पण ऑथा व डार्टा यांना विभक्त राहणे संमत नसल्याने त्यांनी दोघांनी बाहेर पडवीतच पथारी पसरण्याचे ठरविले. ''ह्या लेकाच्याचे अगत्य जरा न्यारे दिसते.'' डार्टा ऑथाला हळूच म्हणाला. ऑथाचा नोकर 'ग्रीमाँ' तबेल्यात घोड्यांच्या जवळ निजला व डार्टाचा नोकर प्लाँशे पडवीच्या दारातच पहुडला. आपल्या धन्यावर पहारा करण्याचाच जणू त्याचा विचार होता.

भल्या पहाटे तबेल्यात एकदम काहीतरी दंगा उसळला. तबेल्यातील पथिकाश्रमाच्या नोकराने ग्रीमाँ व घोडे यांना यथास्थित झोडपून काढले होते. ग्रीमाँला झीट आली होती व घोडे प्रवासास निरुपयोगी झाले होते. प्लाँशेने पळत जाऊन हा सर्व प्रकार पाहिला व धन्याला वार्ता दिली. ऑथा व डार्टा यांना एकामागून एक येणाऱ्या या संकटांचा मोठा अचंबा वाटला व याच्या बुडाशी कार्डिनलचे

कारस्थान असावे अशीही दाट शंका आली. आणि त्यांची ही शंका लवकरच खरीही ठरली.ऑथा पैसे भागविण्यासाठी म्हणून पथिकाश्रमाच्या धन्याकडे जाताच त्याने प्रत्येक नाणे बारकाईने खाली वर करून बराच वेळ पाहिले व शेवटी त्यातील बरीच नाणी खोटी असल्याची ग्वाही दिली. प्रत्येक नाणे खरे असल्याची ऑथाला खात्री होती. पण पथिकाश्रमाच्या धन्याची समजूत पटण्याचे चिन्ह दिसेना. खोटी नाणी चालविण्याचा प्रयत्न केल्याबद्दल तो ऑथाला पकडण्याची धमकी देऊ लागला. इतक्यात चार नखशिखांत सशस्त्र लोक आत आले व त्यांनी ऑथाला गराडा दिला. ऑथाला आपल्यावरील बिकट प्रसंगाची कल्पना येताच त्याने ओरडून डार्टाला पळ काढण्याची सूचना दिली. ''डार्टा, दगा. पळ.'' तो मोठ्याने ओरडला. डार्टा मोठा चाणाक्ष होता. त्याने तत्काळ प्लाँशेला घेऊन दारातच उभ्या असलेल्या घोड्यांवर मांड टाकली व इतक्या झटक्याने टाच दिली की घोडे दौडत सुटले. कॅलेच्या बाहेर येऊन पोहोचेपर्यंत घोड्यांच्या तोंडाला फेस आला होता. त्या प्राण्यांनी भूमीवर अंग टाकताच डार्टा व प्लाँशे दोघेही चालतच बंदराकडे निघाले. त्यांच्या जरा पुढेच प्रवासाने शिणलेला एक गृहस्थ व त्याचा नोकर चालला होता. डार्टा व प्लाँशे या दोघांनी घाईने त्या दुकलीला गाठले. बंदरात उभ्या असलेल्या जहाजाच्या कप्तानाला तो नवा गृहस्थ आपल्याला व आपल्या नोकराला इंग्लंडला जाण्यासाठी त्याच्या जहाजावर जागा देण्यासाठी विनवीत असता डार्टाने ऐकले. इंग्लिश खाडी ओलांडून ही धनी-नोकरांची जोडी इंग्लंडला चालली होती.

''ही गोष्ट इतकी सोपी नाही.'' जहाजाचा कप्तान सांगत होता. ''आज सकाळीच कार्डिनलची विशेष आज्ञा आली आहे. त्याच्या परवानगीवाचून कोणालाच जहाजात बसून आता इंग्लंडला जाता येणार नाही.''

''माझ्याजवळ तशी परवानगी आहे, ही पाहा.'' असे म्हणून त्या गृहस्थाने आपल्या खिशातून एक कागदाची सुरळी बाहेर काढली.

''मग आता असं करा. त्या टेकडीच्या पायथ्याशी बंदराधिकाऱ्याचा बंगला आहे, तिथं जाऊन तुमच्या या परवान्यावर मान्यतेची सही आणा. म्हणजे मग मी आपल्याला माझ्या जहाजावरून इंग्लंडला नेऊन सोडतो.'' कप्तान म्हणाला.

''काही हरकत नाही.'' असे म्हणून तो गृहस्थ आपल्या नोकरासह बंदराधिकाऱ्याच्या घराकडे जाण्यास निघाला. डार्टा व प्लाँशे या दोघांनी हळूच त्यांचा पाठलाग चालू केला व एका झाडीच्या जागी त्यांना गाठलेच. त्यांच्यापुढे धावत जाऊन डार्टा म्हणाला, ''काय महाशय, बंदराधिकाऱ्याकडे चालला आहात वाटतं? मीही कामासाठी तिकडेच जातो आहे. आपण मगच या, माझं काम महत्वाचं व खाजगी आहे.''

''छे, छे! मला आधी जाणंच भाग आहे. उद्या दुपारच्या आत मला लंडनला पोचायचं आहे. जहाज सज्ज आहे. माझ्याकडून खोटी होऊन चालणार नाही.''

''मला पण उद्याच लंडनला जायचं आहे. माझ्यापेक्षा तुमचं काम खचितच महत्वाचं नाही. मीच आधी जाणार.''

''भल्या गृहस्था, तुझा भांडण उकरून काढण्याचा उद्योग दिसतो.'' तो गृहस्थ संतापाने म्हणाला, ''तुला पाहिजे तरी काय?''

''इंग्लंडला जाण्यासाठी तुमच्याजवळ असलेला परवाना मला पाहिजे आहे. मजजवळ तो नसल्यानं मला त्याची फार आवश्यकता आहे.''

''झक् मारतोस तू! लुबीन, माझं पिस्तुल आण पाहू.'' तो गृहस्थ आपल्या नोकराकडे पाहून ओरडला.

''प्लाँशे, त्या पोराला सांभाळ. मी याचं पाहतो काय ते.'' डार्टा ओरडला. प्लाँशेने लुबीनवर झडप घालून त्याला केव्हाच लोळविले. इकडे डार्टाने त्याच्या धन्याचे तीन तेरा केले. तरवारीच्या फटकाऱ्याने त्याला घायाळ करून त्याने भुईवर लोळविले व त्याच्या जवळचा परवाना काढून घेतला. नोकराची व धन्याची चांगली मोटली बांधून त्याने बंदराधिकाऱ्याच्या घराचा रस्ता धरला. परवान्यावर 'काऊंत द वार्देस' असे नाव होते. अर्थात् बंदराधिकाऱ्याला डार्टाने तो गृहस्थ आपणच असल्याचे सांगितल्यास आश्चर्य नाही.

''कार्डिनलच्या सहीचा परवाना आपणापाशी आहे काय?'' अधिकाऱ्याने विचारले.

''होय, हा काय!'' डार्टा डाका घालून मिळालेला परवाना पुढे करून म्हणाला.

''कोणीतरी मनुष्य इंग्लंडला जाण्याच्या उद्योगात असावा, त्याला थांबविण्याचा कार्डिनलचा बेत दिसत आहे.''

''डार्टा नावाचा गृहस्थ लंडनला जाण्यासाठी आपल्या मित्रांसह पॅरिसहून निघाला आहे, त्यालाच अडकविण्याचा कार्डिनलचा विचार आहे.'' डार्टाने निर्विकार मुद्रेने खुलासा केला.

''तुम्हाला डार्टा कोण माहीत आहे? त्याचे वर्णन तुम्ही करू शकाल?'' अधिकाऱ्याने विचारले.

''हो'' डार्टा बेधडकपणे म्हणाला आणि त्याने खुशाल जंगलात बेशुध्द पडलेल्या 'काऊंत द वार्देस'चे वर्णन झोकून दिले.

''त्याच्याबरोबर आणखी कोण आहे?''

''लुबीन नावाचा त्याचा नोकर!'' डार्टाने चक्क सांगितले.

''ठीक! आम्ही या जोडीवर बारीक लक्ष ठेवू व त्यांना पकडून बंदोबस्ताने कार्डिनलकडे पॅरिसला पाठवून देऊ.'' अधिकारी म्हणाला व त्याने सही करून परवाना परत डार्टाच्या हाती दिला.

''आभारी आहे, महाराज.'' परवाना खिशात कोंबीत डार्टा म्हणाला. डार्टाने प्लाँशेसह बंदराकडे धाव घेतली. जहाज बंदरात सज्ज होऊन उभेच होते. ''बंदराधिकाऱ्याची सही घेऊन हा परवाना आणला आहे.'' डार्टा जहाजाच्या कप्तानाला परवाना दाखवीत म्हणाला.

''ठीक आहे.'' कप्तान ते पाहून उद्गारला.

''मग आता झालीच ना वेळ सुटायची?'' डार्टाने विचारले.

''आणखी एक गृहस्थ येणार होते.'' कप्तान म्हणाला.

''त्यानी आज येण्याचा बेत रहित केला आहे. हे माझे व माझ्या नोकराचे भाड्याचे पैसे.'' डार्टा त्याच्या हाती पैसे कोंबीत घाईने म्हणाला.

''अच्छा, चढा जहाजावर. मलाही आता विलंब करण्यास सवड नाही. लगेच सोडतोच जहाज.''

दुसऱ्या दिवशी सकाळी दहाच्या सुमारास डार्टा आणि प्लाँशे लंडनमध्ये येऊन सुखरूप पोचले.

●●●

## १५. फिरून बकिंगहॅमचा ड्यूक

डार्टा लंडनमध्ये ह्यापूर्वी कधीच आला नव्हता व त्याला इंग्लिश भाषेचा गंधही नव्हता. त्याने एका कागदाच्या कपट्यावर बकिंगहॅमच्या ड्यूकचे नाव लिहिले व तो कपटा त्याने ज्याला त्याला दाखविण्यास प्रारंभ केला. शेवटी एकाने त्याला बकिंगहॅमच्या ड्यूकचा प्रासाद दाखविला. पण दुर्दैव त्याचे, ड्यूक इंग्लंडच्या राजाबरोबर मृगयेसाठी म्हणून विंडसरला गेला होता. बकिंगहॅमच्या ड्यूकचा हुजऱ्या उत्तम फ्रेंच बोलणारा होता. डार्टाचा एकंदर वृत्तांत ऐकून व त्याच्या कामाचे महत्व जाणून त्याने स्वतः डार्टाला आपल्या धन्याकडे नेऊन सोडण्याची कामगिरी पत्करली. त्याने उत्तमपैकी तीन घोडे निवडले व थोड्याच वेळात डार्टा, प्लाँशे व तो हुजऱ्या मृगयेच्या जागी येऊन पोहोचले. ''धनीसाहेबांना कोण आलं आहे म्हणून वर्दी देऊ?'' हुजऱ्याने डार्टाला विचारले.

''तुमच्याशी पॅरिसमध्ये भांडण उकरून काढलेले गृहस्थ आले आहेत म्हणून सांगा.'' डार्टा म्हणाला.

ड्यूक येताच प्रथम त्याने विचारले, '''राणी ठीक आहे ना?''

''नाही. त्या काहीतरी संकटात आहेत. त्यानी तुम्हाला एक पत्र दिलं आहे.'' डार्टा चिंतातुर स्वरात म्हणाला.

ड्यूकने कापऱ्या हातांनीच पत्र फोडले. ''पॅट्रिक,''

ड्यूक ओरडून आपल्या हुजऱ्यास म्हणाला, ''राजेसाहेबांना म्हणावं, मी अत्यंत निकडीच्या कामासाठी लंडनला जात आहे. क्षमा असावी त्याबद्दल. मॉन्सिर डार्टा, चला. आपणांस घाई केलीच पाहिजे.'' थोड्याच वेळात ड्यूक व डार्टा लंडनच्या दिशेने दौडत निघाले.

घरी पोहोचताच ड्यूकने डार्टाला आपल्या गुप्त खोलीत नेले. तेथे समोरच भिंतीवर फ्रान्सच्या ॲन राणीचे भले मोठे चित्र लावलेले होते. खोलीत उंची सामान-सुमानाची नुसती रेलचेल झाली होती. ॲनचे चित्र इतके हुबेहुब होते की डार्टाला ती स्वतःच खोलीत असल्याचा क्षणभर भास झाला. त्या चित्राखालीच टेबलावर असलेली एक छोटी सुंदर पेटी बकिंगहॅमने घेतली व तीमधून रत्नपदकांची एक तेजस्वी माळ बाहेर काढली. पदकावरील हिरे लखलख करीत होते.

''हा रत्नहार इथं आहे.'' ड्यूक म्हणाला, ''राणीनं एकदा तो मला भेट दिला व मी जिवापलीकडे जतन केला. तिला तो आता परत पाहिजे आहे तर तो परत करणं माझं काम आहे.'' ड्यूकने मोठ्या प्रेमाने तो हार हाती घेऊन निरखला आणि त्याच्या तोंडातून एक अस्फुट किंकाळी बाहेर पडली. ड्यूकला भीतीने पांढराफट पडलेला पाहून डार्टाने हळूच विचारले, ''काय झालं महाराज?''

''ह्यांतली दोन पदकं दिसत नाहीत. मी हार आणला त्यावेळी बारा पदकं होती, आता दहाच दिसत आहेत.'' ड्यूक ओरडला.

''ही पदकं हरवली, का चोरीला गेली? आपणाला काय वाटतं?''

''निश्चितपणे ती चोरीलाच गेलेली असली पाहिजेत. कात्रीनं कुणीतरी ती कापून घेतलेली दिसतात आणि निःसंशय कार्डिनलचंच हे कारस्थान!'' ड्यूक उत्तरला, ''आठवड्यापूर्वी विंडसरला राजेसाहेबांनी नृत्याचा कार्यक्रम केला होता, त्यावेळी ही रत्नमाला मी घातली होती. 'कौंतेस द विंटर'ने त्या दिवशी निष्कारण बोलाचाली करून माझ्याशी तंटा निर्माण केला. ही बया कार्डिनलची हेर आहे व ती फ्रान्समध्ये स्वतःला 'मिलडी' म्हणवून घेत असते. तिचंच हे काम!''

''ह्या कार्डिनलला जगात सारीकडे हेर मिळतात तरी कसे कोण जाणे!'' डार्टा आश्चर्याने उद्गारला.

''महाभयंकर प्राणी आहे तो! बरं, आपल्याकडील नृत्याचा कार्यक्रम आहे तरी केव्हा?''

''येत्या सोमवारी.''

''अद्यापि पाच दिवस आहेत. बहुधा तेवढ्यात काहीतरी व्यवस्था करता येईल. '' असे म्हणून ड्यूकने एकामागून एक आज्ञा सोडण्यास आरंभ केला.

आपला रत्नपारख्या व चिटणीस ह्यांना ड्यूकने तत्काळ बोलावून घेतले. ते दोघे येताच यापुढे इंग्लंडच्या कोणत्याही बंदरातून कोणतेही जहाज परवानगीवाचून बाहेर पडू देऊ नये अशाविषयी त्याने आज्ञा सोडून सर्व व्यवस्था जातीने केली. रत्नपारखी व कारागीर येताच त्याने त्यांना छत्तीस तासांत उरलेल्या दहा पदकांत बसणारी तंतोतंत तशीच आणखी दोन पदके बसविण्याची आज्ञा केली.

''महाराज, हे कसं जमणार?'' ते कारागीर म्हणू लागले.

''कसं-बिसं मी जाणत नाही.'' ड्यूकने खडसावले. ''आपली हत्यारं-पात्यारं व हिरे घेऊन येऊन हे काम इथं बसून पुरं करा, त्यावाचून सुटका नाही हे ठाम समजा!''

कारागिरांना आता चुकारपणा करणेच शक्य नव्हते. ही सर्व व्यवस्था झाल्यानंतर बकिंगहॅम डार्टाला म्हणाला, ''तरुण मनुष्या, तू माझ्यासाठी व फ्रान्सच्या राणीसाठी केलेल्या या कामगिरीबद्दल मी तुला काय बक्षिस देऊ?''

डार्टा लाजेने लाल झाला. तो विनयाने म्हणाला, ''फ्रान्सच्या राणीसाहेबांचा मी नोकर आहे. माझं कर्तव्य मी केलं त्यात बक्षिसाचा प्रश्नच संभवत नाही.''

''स्कॉटसारखा स्वाभिमानी अशी आमच्याकडं म्हण आहे.'' ड्यूक पुटपुटला.

''गॅस्कनसारखा स्वाभिमानी असं आम्ही म्हणतो.'' डार्टा उत्तरला.

ड्यूक त्याला पुढे म्हणाला, ''तू ज्या वेळी फ्रान्सला पोचशील, त्यावेळी सेंट व्हेलरी बंदरातील छोट्या पथिकाश्रमात जा. तेथील धन्याला 'पुढे' हा परवलीचा शब्द तू सांगताच तो उत्तम घोडा देईल व कोणत्या मार्गाने जायचं ते सांगेल. पॅरिसपर्यंत अशा चार पथिकाश्रमांत तुला थांबावं लागेल व प्रत्येक ठिकाणी तुला नवा घोडा

मिळेल. प्रत्येक ठिकाणी तू आपला पॅरिसचा पत्ता ठेवीत गेलास तर मागाहून हे चारी घोडे तुझ्या बिऱ्हाडी आणून पोचविले जातील. तू कितीही स्वाभिमानी असलास तरी या देणगीचा अव्हेर तू करणार नाहीस अशी आशा आहे. निदान तुझ्या मित्रांना तरी ते उपयोगी पडतील.''

''मी या देणगीचा अवश्य स्वीकार करतो'' डार्टा म्हणाला, ''तुमच्या या देणगीचा आम्हाला अत्यंत उपयोग होईल.''

छत्तीस तासांत कारागिरांनी आपली कामगिरी अप्रतिम रितीने पुरी केली व थोड्याच वेळात डार्टा फिरून परत पॅरिसच्या प्रवासाला लागला. ड्यूकने त्याच्यासाठी सज्ज ठेवलेल्या छोट्या जहाजावर तो चढला. पण चढत असतानाच बंदरात नांगर टाकून उभ्या असलेल्या एका गलबतावर त्याला एक स्त्री दिसली. मिअंग येथे त्याच्या शत्रूशी गाडीतून बोलताना त्याने पाहिलेली तीच ही स्त्री. तिला त्या गृहस्थाने 'मिलडी' म्हणून संबोधतानाही डार्टाने ऐकले होते. त्या स्त्रीने आपणाला बहुधा पाहिले असावे अशी डार्टाला शंका आलीच.

ड्यूकने सांगितलेल्या मार्गाने शेवटी एकदा डार्टा सेंट व्हेलरीला उतरल्यापासून बारा तासांनी पॅरिसला येऊन पोचला.

●●●

## १६. नृत्य

दुसऱ्या दिवशी राजाने ठरविलेल्या नृत्याच्या कार्यक्रमाव्यतिरिक्त पॅरिसमध्ये जनतेला दुसरा विषय नाही हे डार्टाला कळून आले. लोक मोठे आनंदात होते. नृत्याच्या कार्यक्रमाची सिध्दता झपाट्याने चालू होती. राजाराणी जातीने भाग घेणार असल्याने जनतेचा उत्साह दुणावला होता. त्या दिवशी संध्याकाळी प्रथम राजाच्या आवडत्या नृत्याने कार्यक्रमाला आरंभ होणार होता व राणी स्वतः त्यात भाग घेणार होती. नगरभवनात नृत्यासाठी स्वतंत्र मंडप उभारण्याचे काम रात्रंदिवस चालू होते. कपडे पालटण्यासाठी अनेक स्वतंत्र खोल्या करण्यात आल्या होत्या.

नृत्याच्या दिवशी सकाळपासून नृत्यमंडपाबाहेर व आत मॉन्सिर डेसार्टचे स्वतंत्र संरक्षक दल कडक पहारा करीत होते. सायंकाळी सहा वाजल्यापासून निमंत्रित पाहुण्यांच्या आगमनाला सुरुवात झाली; पण स्वतः राजा येईपर्यंत मध्यरात्र झाली. लोकांनी एकच दंगल करून मोठ्या हर्षभराने राजाचे स्वागत केले. मुख्याधिकाऱ्याने सामोरे जाऊन राजाचे मोठ्या आदराने स्वागत केले; पण राजाची चर्या काही ठीक दिसली नाही. तो किंचित श्रमल्यागत, चिडल्यागत दिसत होता. आत येताच त्याने फार उशीर झाल्याबद्दल खेद व्यक्त केला व कार्डिनलने अकरा वाजेपर्यंत राजकीय गोष्टींचा खल करून अडकवून ठेवल्यामुळे हा उशीर झाला असाही खुलासा केला. नंतर नृत्याला योग्य असा वेश करण्यासाठी राजा एका खोलीत निघून गेला.

सुमारे अर्ध्या तासाने राणी आली. तिची चर्याही किंचित त्रासलेली व उदासीनच दिसत होती. राणी आत येताच एका सज्जाचा पडदा दूर केला गेला. तेथे कार्डिनल स्पॅनिश सरदाराच्या वेशात बसलेला दिसून आला, त्याची चर्याही किंचित उतरलेली होती, पण तो राणीकडे निरखून पाहात होता. राणीच्या गळ्यात रत्नहार नाही हे त्याच्या लक्षात येताच त्याच्या तोंडावर दुष्ट स्मिताची एक लहर येऊन गेली. आता तत्काळ राजाच्या कानांवर ही गोष्ट घालण्यास प्रत्यवाय नाही असा विचार त्याच्या डोक्यात आला.

कपडे पालटण्यास खोलीकडे जाण्यापूर्वी राणी तेथे जमलेल्या अधिकाऱ्यांशी व त्यांच्या स्त्रियांशी बोलत उभी होती. जणू काही कालहरण करण्याचाच ती प्रयत्न करीत होती; पण इतक्यात क्रोधाने लाल झालेला राजा लांब

लांब पावले टाकीत एकदम तिकडे आला.

''रत्नमाला परिधान करण्याची मी स्पष्ट आज्ञा केली असताना ती अमान्य करण्याचं तुम्हाला कारण काय?'' तो एकदम क्रोधाने गरजला.

''महाराज,'' राणी अडखळत म्हणाली, ''अशा प्रचंड समारंभात कदाचित तो हरवेल अशी मला भीती वाटली.''

''चुकीची समजूत आहे. हेतुपूर्वक दिलेला अलंकार अशा प्रसंगी घालण्यासाठी असतो; पेटीत जपून ठेवण्यासाठी नाही.'' राजा कडाडला.

राजाच्या या चमत्कारिक क्रोधाचे सार्वजनिक प्रदर्शन पाहून सर्वच स्त्री-पुरुष आश्चर्याने गांगरून गेले. खरे कारण त्यांना काहीच माहीत नसल्याने त्यांना या प्रकाराचा अर्थच कळेना. राजा-राणीपासून सर्वजण हळू हळू दूर सरकू लागले. याच्या बुडाशी असलेले कार्डिनलचे कारस्थान कोणाच्याच ध्यानात आले नाही.

''आपली अिच्छाच असेल महाराज, तर राजवाड्याकडे कुणीतरी मनुष्य पाठवून तो रत्नहार आणण्याची मी व्यवस्था करते.'' राणीचे हे शब्द सर्वांच्या कानी आले.

''तत्काळ व्यवस्था करा. नृत्य लवकरच सुरू होईल.'' राजा म्हणाला. एवढे संभाषण होऊन राजा-राणी कपडे पालटण्यासाठी आपापल्या खोल्यांकडे निघून गेली.

लुई नृत्याच्या वेषात बाहेर येताच कार्डिनलने त्याच्याकडे धाव घेतली व त्याच्या हाती एक छोटीशी पेटी दिली; राजाने पेटी उघडून पाहिली तो काय! रत्नहारापैकी हिरेजडित दोन पदके!

''ह्याचा अर्थ काय?'' त्याने आश्चर्याने विचारले.

''ह्याचा अर्थ एवढाच की, राणीसाहेबांपाशी बहुधा आपण दिलेली रत्नमाला असणार नाही; असलीच तर तीत दहाच पदके असणार. मग आपणच त्यांना दोन पदके कशी चोरीला गेली याचा उलगडा विचारा, म्हणजेच झाला तर काही खुलासा होईल.'' कार्डिनल मिस्किलपणे म्हणाला.

राजा बुचकळ्यात पडला. पण नृत्याचा खोळंबा करून ही चौकशी करीत बसणे अप्रशस्त दिसेल म्हणून त्याने नृत्यास आरंभ केला. राणीच्या अप्रतिम सौंदर्याने सारा जनसंमर्द भारला गेला होता, मंत्रमुग्ध झाला होता. तिच्या लावण्याने मूढ बनलेला समाज तिच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव करीत होता. एखाद्या शिकाऱ्याप्रमाणे तिने करड्या रंगाचा वेष केला असून निळ्या साटनीची त्यावर कुसर होती.डोक्यावरील टोपीत सुंदर निळी पिसे डोलत होती. खांद्यावरून रुळणाऱ्या रत्नमालेच्या पदकांवरील हिरे दीपप्रकाशात चम्चम् करीत होते. सर्व समुदायात राणीइतकी लावण्यवती स्त्री दुसरी नाही याविषयी सर्वांचे एकमत झाले होते.

राणीच्या गळ्यातील रत्नहार पाहताच राजाची कळी जरा खुलली. त्याच्या मनावर कार्डिनलने आणलेले दडपण पुष्कळसे दूर झाले. कार्डिनलच्या तंगड्या त्याच्याच गळ्यात आल्याचे पाहून त्याला अत्यंत समाधान वाटले. प्रश्न आता एवढाच होता की पदके दहा आहेत की बारा आहेत? नृत्य सुमारे तासभर चालू होते व त्यामुळे राजाला इच्छा असूनही पदके मोजण्याची संधी मिळाली नाही. नृत्य संपताच मात्र लागलीच त्याने राणीकडे धाव घेतली आणि म्हटले, ''माझ्या म्हणण्याला मान देऊन तुम्ही रत्नमाला धारण केलीत हे फार छान झालं, पण त्यातील दोन पदकं मात्र आपण हरवली आहेत ती या प्रसंगाने फिरून मी आपणांस भेट देतो.'' राजाने एवढे बोलून कार्डिनलने दिलेली दोन पदके राणीच्या हाती दिली.

तोंडावर आणता येईल तितका आश्चर्याचा भाव आणून राणी म्हणाली, ''वाऽ मजकडे तर बारा पदकांचा हार आहे. आपल्या या नव्या देणगीने ती आता चौदा होतील.'' राजाने राणीच्या गळ्यातील रत्नहाराची पदके मोजून पाहिली, ती बारा होती.

''कार्डिनल रिचल्यू,'' तो संतापानं ओरडला, ''हा काय प्रकार आहे?'' कार्डिनल आपली तिरपीट शक्यतो झाकून मोठ्या विनयाने म्हणाला, ''महाराज, मला राणीसाहेबांना दोन रत्नपदकं भेट म्हणून देण्याची मनीषा होती. ती प्रत्यक्ष त्यांना देणं मला प्रशस्त वाटलं नाही म्हणून या मार्गाचा अवलंब करावा लागला. याबद्दल क्षमा असावी.''

कार्डिनल धडधडीत खोटे बोलत आहे हे राणी पूर्ण

ओळखून होती. पण लटकेच स्मित करून ती म्हणाली, ''आपल्या दोन पदकांचा मी अत्यंत आदराने स्वीकार करते. राजेसाहेबांना सबंध रत्नमालेला द्यावं लागलं नसेल इतकं भारी मोल या दोन पदकांना आपणाला द्यावं लागलं असेल याची मला कल्पना आहे.'' कार्डिनलचा राणीच्या या टोमण्याने चांगलाच जळफळाट झाला, पण राणीशेजारी उभा असलेल्या डार्टावाचून कोणाच्याच लक्षात तो येणे शक्य नव्हते.

बॉन्सिअबाईच्या मित्राचे, म्हणजे डार्टाचे आपणावर किती अगणित उपकार झाले आहेत हे राणी विसरणे शक्य नव्हते. डार्टामुळे आज तिची अब्रू वाचली होती व कार्डिनलचे कारस्थान त्याच्याच अंगाशी आले होते. नृत्य आटोपताच तिने डार्टाला गुप्तपणे घेऊन येण्यासाठी बॉन्सिअबाईची पाठवणी केली.

बॉन्सिअबाईने अत्यंत गुप्तपणाने एका चोरमार्गाने डार्टाला एका गुप्त अंधाऱ्या खोलीत आणून सोडले. तेथील अंधाराशी डार्टाचे डोळे जरा सरावतात न सरावतात तोच तेथील एक मखमली पडदा किंचित हलताना त्याला दिसला. डार्टा निश्चल उभा होता. थोड्याच वेळात पडद्यामागून एक सुंदर गौरवर्ण हात पुढे आला. तो राणीचा आहे हे ओळखण्यास डार्टाला मुळीच विलंब लागला नाही. त्याने आदराने गुडघे टेकून त्या नाजूक हाताचे चुंबन घेतले. तो नाजूक हात आला तसाच हळूच पडद्याआड दिसेनासा झाला. पण जाताना त्याने एक सुंदर मौल्यवान अंगठी डार्टाच्या हातात टाकली. संरक्षक दळातील या नवीन प्रामाणिक सेवकाला राणीने स्वतंत्र देणगी दिली. डार्टाला अपरिमित आनंद झाला.

कार्डिनलने पदके मिळविली त्या अर्थी मिलडी पॅरिसमध्ये आली आहे, हे डार्टाला कळून चुकले. प्रवासात वाटेत गळलेले त्याचे स्नेही एव्हाना परत आले होते. सर्वांनी मिळून मिलडीला इंग्लंडच्या वाटेवर असताच गाठले. तिने पुष्कळ गयावया करून पाहिले, पण आतापर्यंत तिने केलेल्या कुटिल कारस्थानांची मालिका इतकी मोठी निघाली की तिला चांडाळाकरवी देहांत प्रायश्चित्त देण्यास या चौघा बहादुरांनी कमी केले नाही. मिलडीचा व कार्डिनलचा दुसरा हस्तक जो रोशफोर, म्हणजे डार्टाचा मिअंग प्रकरणातील शत्रू - तोही लवकरच त्या चौकडीच्या हाती लागला. पण त्याच्या प्राणांवर आलेले शेपटावरच निभावले.

डार्टाची शिलेदार पथकात नेमणूक झाल्याची राजेसाहेबांची विशेष आज्ञा थोड्याच दिवसांत डार्टाच्या हाती पडली.

संपली डार्टाची कथा येथेच.

●●●